रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //



वर्ष : १ अंक : १०

साद

ऑक्टोबर २०१८

कुपोषण

प्रगतीतील अडसर

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा

विजया रहाटकर

सदस्य

नीता राजेंद्र ठाकरे

सदस्य

गयाताई शिवाजीराव कराड

सदस्य

देवयानी ठाकरे

सदस्य

विंदा कीर्तीकर

सदस्य

ॲड. आशा लांडगे

पदसिद्ध सदस्य

दत्ता पडसलगीकर
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव

डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

साद

मुख्य संपादक
विजया रहाटकर

कार्यकारी संपादक
डॉ. मंजूषा मोळवणे

सहायक संपादक
कपालिनी सिनकर

प्रकाशक
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
फोन : ०२२-२६५९०८७८

मुद्रक
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३

वाचक संपर्क :
saad.mscw@gmail.com

आयोगाशी संपर्क :
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

'सुहिता' हेल्पलाइन
७४७७७२२४२४

स्वागत मूल्य : ₹ १०
वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००

संपादकीय

वेदनेचा सन्मान

कदाचित, शीर्षक वाचून थोडे अडखळायला होईल, की वेदनेचा सन्मान कसा काय होऊ शकतो. पण यंदाच्या नोबेल पारितोषिक विजेत्यांतील शांततेचे नोबल मिळविलेल्या नादिया मुराद आणि डॉ. डेनिस मुकवेगे यांच्या कार्याकडे लक्ष घातल्यानंतर लक्षात येईल, की यंदा खरोखरच वेदनेचा सन्मान झाला आहे. या वेदना आहेत, बलात्कारित स्त्रियांच्या.

बलात्कार हा खरे तर नाके मुरडण्याचा, शक्य झाल्यास बोलणे टाळण्याचा आणि फार तर कोरडी सहानुभूती दाखवून गप्प बसण्याचा विषय. मात्र, या दोन्ही नोबेल विजेत्यांनी या विषयाला आंतरराष्ट्रीय पातळीवर पाठिंब्याचा आवाज मिळवून दिला. अर्थात, या पारितोषिकासाठी मी टू ही जगभरातील मोहीम हातभार लावणारी ठरली, हे अजिबात नाकारता येणार नाही. कधी ना कधी आपल्यावर कोणी तरी अत्याचार केले, वा शोषण केले, हे सांगण्याची जी एक ऊर्मीयुक्त लाट जगभरात उसळली, त्याचाच परिणाम म्हणून यंदाचे नोबेल अशा व्यक्तींना जाहीर करण्यात आल, ज्यांनी बलात्कार पीडितांसाठी काम केले आहे.

डॉ. डेनिस मुकावेगे यहे कांगोचे. आपल्यातील किती लोकांना कांगो हा देश नकाशावर दाखवता येईल? मुकवेगे ज्या गावात काम करीत तेथे दिवसचे दिवस वीज नसे, तरीही त्यांनी बलात्कार पीडितांवर उपचार केले. त्यांच्या दुःखावर फुंकर घातली. यादवी, बंडखोरी त्यातून उद्भवणारे सशस्त्र संघर्ष आणि त्याचा अपरिहार्य बळी ठरणाऱ्या स्त्रिया. अशांसाठी डॉ. मुकवेगे यांनी काम केले आहे.

नादिया मुराद तर स्वतः पीडित. इराकमधील याजिदी या अल्पसंख्याक जमातीतील ही तरुणी. उत्तर इराकमधील शोंजू हे त्यांचे गाव. इस्लामिक स्टेटच्या दहशतवाद्यांनी त्यांच्या गावातील सर्वांचे अपहरण केले. त्यातील पुरुषांना आधी मारून टाकण्यात आले. त्यात नादिया यांच्या भावांचा आणि वडिलंचाही समावेश होता. त्यानंतर ज्या स्त्रियांचा लैंगिक उपभोग घेता येणार नाही, अशा स्त्रियांना म ारण्यात आले आणि उरलेल्यांना भोगदासी (सेक्स स्लेव्ह) म्हणून दहशतवाद्यांच्या हवाली करण्यात आले. सतत तीन महिने नादियांवर रोज बलात्कार होत होता. अखेर त्यांनी स्वतःची सुटका करून घेतली आणि देशांतर करून जगासमोर आपली कहाणी मांडली.

ही वर्णने वाचतानाही अंगावर काटा येतो. ज्यांनी ते सारे दुःख भोगले आहे, पचविले आहे, त्यांच्या दुःखाची कल्पनाच न केलेली बरी. अशा या वेदनेचा गौरव केल्याबद्दल रॉयल स्वीडिश अकादमीचे अभिनंदन आणि दोन्ही नोबेलविजेत्यांना सलाम.

VRahatkar

विजया रहाटकर, मुख्य संपादक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

वाचकांना निवेदन 'साद' हे महिला आयोगाचे मुखपत्र असले तरी, येथे प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक लेखांशी आयोग सहमतच असेल, असे नाही.

पत्नीला सोडणाऱ्या एनआरआयबाबत केंद्राचा लवकरच कायदा

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांची माहिती

इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी वृत्तपत्रात १७ सप्टेंबरच्या अंकात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांची शुभांगी कापरे यांनी घेतलेली मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. या मुलाखतीचा मराठी अनुवाद.

एनआरआय पतींकडून पत्नींना सोडून देण्याचे प्रकार वाढत आहेत. या प्रश्नावर उपाय शोधण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग काय करीत आहे?

- ही समस्या अत्यंत गंभीर आहे. अशा घटनांमध्ये अनेकदा संबंधित एनआरआय पतीचा माग काढणे आमच्यासाठी अवघड बनते. त्यांना बजावलेली समन्स ते स्वीकारत नाहीत. परदेशातील पत्ता, फोन नंबर, ई मेल ते बदलतात. रेड कॉर्नर नोटीस बजावणे, त्यांची मालमत्ता जप्त करणे, त्यांच्याविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करणे आणि न्यायालयीन खटल्याची प्रक्रिया सुरू करणे हेही पर्याय वापरले जातात.

जेव्हा समक्ष नोटीस बजावणे शक्य नसते, अशा वेळी काय करायचे, याबाबत आम्ही काही सूचना केल्या आहेत. या समस्येता तोंड देण्यासाठी केंद्र सरकारलवकरच एक कायदा करणार आहे. अशा प्रकरणांमध्ये परराष्ट्र मंत्रालयाच्या वेबसाइटवर नोटीस बजावण्यात यावी, अशी सूचना आम्ही केली आहे. विहीत कालावधी उलटल्यानंतर ती नोटीस बजावली गेली आणि स्वीकारली गेली असे मानले जाईल. त्यामुळे पुढील कार्यवाही करणे सुकर होईल. सरकार या दृष्टीने

अत्यंत गंभीरपणे प्रयत्न करीत आहे.

आतापर्यंत अशा दहा प्रकरणांमध्ये दोषी व्यक्तींना पासपोर्ट नाकारण्यात आले आहेत. बहुतांश प्रकरणांमध्ये पीडित महिला एकाकी पडते आणि तिला त्रास सहन करावा लागतो. विधिवत विवाह झाला असला तरीही पती पत्नीला सोडून देतात, तिच्याशी संपर्क तोडून टाकतात आणि सासू-सासरेही अशा सुनांना घरी ठेवून घेत नाहीत.

भाजपचे आमदार राम कदम यांनी अलीकडेच महिलांविषयी आक्षेपार्ह उद्गार काढले. राज्य महिला आयोगाने त्यांच्याविरोधात काय कारवाई केली?

महिलांची प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य यांना बाधा आणणाऱ्या कोणत्याही विधान निषेधार्हच आहे. या विशिष्ट प्रकरणामध्ये राज्य महिला आयोगाने स्वाधिकारे (स्यू मोटो) दखल घेतली आणि कदम यांना नोटीस बजावली. कदम यांना आयोगासमोर हजर राहून बाजू मांडण्यास सांगण्यात आले. प्रचलित नियमांमनुसारच संपूर्ण कारवाई सुरू आहे. ती पूर्ण झाल्यानंतर आम्ही पावले उचलू.

आणखी एका प्रकरणात फेसबुकवर एका शिक्षकाने खासदार प्रीतम मुंडे यांच्याविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्याविरोधात बराच गदारोळ झाल्यानंतर त्याने आपले विधान मागे घेतले. आयोगाने या सर्व घडामोडींची दखल घेतली, हे मी आपल्याला आवर्जून सांगू इच्छिते.

भारतीय दंड संहितेच्या कलम ३७७ विषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाबाबत आपले मत काय आहे?

हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. समलिंगी संबंध ठेवणाऱ्यांनाही न्याय मिळायलाच हवा. मात्र, हा विषय सांस्कृतिक स्वीकारार्हतेचाही आहे, याचेही भान ठेवणे आवश्यक आहे. समलिंगी विवाहांना गुन्हा न ठरविण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय स्वागतार्ह आहे, असे मला वाटते.

लिव्ह इन रिलेशनशिपमधील समस्यांही तुम्हाला वारंवार हाताळाव्या लागतात...

लिव्ह इन ही शहरी भागांतील समस्या आहे, असे आजवर मानले जाई, पण ते आता पूर्णपणे सत्य राहिलेले नाही. खेडेगावे आणि छोट्या शहरांतूनही लिव्ह इन रिलेशनशिपसंदर्भातील तक्रारी आमच्याकडे येत आहेत. बराच काळ एकत्र राहिल्यानंतर जेव्हा दोन्ही जोडीदार विभक्त होतात, तेव्हा समस्या उद्भवतात. या जोडप्याचे औपचारिक लग्न लागले नसल्यामुळे समाज आणि कुटुंबीयांकडून त्यांना पुरेसा पाठिंबा मिळत नाही. समस्या फक्त महिलांनाच जाणवतात, असे मी म्हणणार नाही. पुरुषांनाही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. कित्येकदा दोघांच्याही कुटुंबीयांना त्यांच्या संबंधांविषयी काहीही कल्पना नसते, अशीही काही प्रकरणे आमच्यासमोर आली आहेत.

शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या कशा वेगवेगळ्या आहेत?

शहरी भागातील महिलेला स्वतःची ओळख असते. तिला एकाच वेळी अनेक कामे पार पाडावी लागतात, घर आणि ऑफिस अशा दोन्ही ठिकाणच्या दबावांना तोंड द्यावे लागते. ग्रामीण भागातील महिला अजूनही स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी झगडत आहेत. त्या घराकडे लक्ष देतात आणि शेतात राबतात. त्यांना अजूनही स्वावलंबी स्त्री म्हणून मान्यता मिळालेली नाही, हे दुर्दैवी आहे.

बेटी बचाओ, बेटी पढाओ ही सरकारची महत्त्वाकांक्षी मोहीम आहे. तिचा कितपत उपयोग झाला?

शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांत आता मुलींना स्वीकारले जात आहे, हा या मोहिमेचा सर्वांत मोठा लाभ आहे. मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त ठरली आहे. सरकारने महिलांसाठी अनेक योजना आणल्या आहेत, हे मी आवर्जून नमूद करू इच्छिते. स्वयंपाकाच्या गॅसमुळे ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्यविषयक समस्या कमी झाल्या आहेत. स्वच्छ भारत अभियानांतर्गत देशभरात नऊ कोटी शौचालये बांधण्यात आली. त्याचा महिलांना सर्वाधिक फायदा झाला.

तिहेरी तलाकविषयी काय मत आहे?

हा निर्णय आठ कोटी मुस्लिम महिलांशी संबंधित आहे. त्याचा संबंध राजकारणाशी लावला जाऊ नये. या वटहुकमामुळे महिलांना स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे, या मागणीला तुमचा पाठिंबा आहे का?

हो. घटनेतील ७४व्या दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाले.आता विधानसभा आणि संसदेत महिलांना अधिक प्रतिनिधित्व कधी मिळणार, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

कुपोषण देशाच्या प्रगतीतील अडसर

केंद्र सरकारने सप्टेंबर महिना पोषण मास म्हणून घोषित केला होता. कुपोषणाविरुद्धच्या लढ्यातील एक भाग म्हणून ही मोहीम राबविण्यात आली. केंद्र आणि राज्य सरकारे या समस्येला तोंड देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्या निमित्ताने कुपोषणाच्या समस्येचा घेतलेला आढावा.

प्राची एक्के prachi.ekke@gmail.com

जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानल्या जाणाऱ्या भारतात कुपोषणाने बळी पडणाऱ्या मुलांची संख्या सर्वाधिक असावी ही बाब चिंताजनक आहे. अंतराळात भरारी घेताना देशातील अर्धपोटी गरिबांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. समाजाचा सर्वात कमकुवत वर्गही विकासाच्या मार्गावर यायला हवा. कारण या लोकांना पोटभर जेवण, आरोग्य, शिक्षण आणि सन्मानजनक जीवन प्रदान केल्याखेरीज आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहू शकत नाही.

जगभरात ३८.५ कोटी मुले कुपोषणाने ग्रस्त असून, त्यातील तब्बल ३० टक्के मुले भारतात आहेत. गोरगरीब मुलांना जेऊ-खाऊ घालण्यात आपण नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश याही देशांच्या मागे असावे, हे वास्तव विदारक आहे. भारतासह अनेक विकसित देशात १९.५ टक्के मुलांच्या खाण्या-पिण्यावर आणि अन्य आवश्यक बाबींवर दररोज केवळ १.९ डॉलर इतकी रक्कम खर्च केली जाते.

वॉशिंग्टन येथील इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिटयूटतर्फे (आयएफपीआरआय) जारी करण्यात आलेल्या ग्लोबल हंगर इंडेक्स या अहवालात ११८ देशांच्या यादीत भारताचा ९७ वा क्रमांक आहे. गेल्या काही वर्षात गरिबी, कुपोषण आणि भूकबळींच्या संख्येत थोडीफार घट झाली हे खरे; पण 'आयएफपीआरआय'च्या आकडेवारीनुसार, भारतातील १५.२ टक्के लोक दररोज अर्धपोटी झोपी जातात. पाच वर्षे किंवा त्याहून कमी वय असलेली ३८.७ टक्के भारतीय मुले कुपोषणामुळे कमकुवत प्रकृतीची आहेत. ही सर्व आकडेवारी पाहता, भूकबळी, कुपोषण हे प्रश्न भारतात आजही अक्राळविक्राळ स्वरूपात अस्तित्वात आहेत. हे वास्तव स्वीकारलेच पाहिजे आणि या समस्या कमी करण्याच्या उपाययोजना युद्धपातळीवर राबविल्या पाहिजेत.

या विषयाच्या खोलात शिरण्याआधी कुपोषण म्हणजे काय हे समजून घेऊया. पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते तीला कुपोषण म्हणतात व त्या व्यक्तीला कुपोषित म्हणता येईल. कुपोषण म्हणजे आजार नव्हे परंतु अयोग्य आहार, उपासमार व जीवनसत्वांचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतो. असे मुल लहानश्या आजाराने सुद्धा अशक्त दिसु लागते. उदा. अंगावर सुज येणे, मुल रडके होणे. बाळाची वाढ खुंटणे, वजन व उंची वयाच्या प्रमाणात न वाढणे यालाच कुपोषण म्हणतात. खरं तर, कुपोषणाची समस्या राज्यासाठी नवी नाही. आदिवासीबहुल भागात दारिद्रय, स्थलांतर, सकस आहाराची कमतरता, निरक्षरता अशी अनेक कारणे या कुपोषणास कारणीभूत आहेत पण सरकार त्याकडे हेतूपुरस्सर दुर्लक्षच करीत असल्याचा आतापर्यंतचा अनुभव आहे.

युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंडने दिलेल्या माहितीनुसार, कुटुंबाच्या गरिबीचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसतो. लहान आणि कुमारवयीन मुलांना अत्यंत हालअपेष्टा भोगून मोठे व्हावे लागते. या अहवालात म्हटले आहे की, कुपोषणाने होणा-या मृत्यूंपैकी ५० टक्के मृत्यू पाच वर्षाच्या आतील मुलांचे असतात. गेल्या पंचवीस वर्षांत मुलांच्या कुपोषणाची समस्या थोडी कमी झाली आहे. परंतु दक्षिण आशियाई देशांमध्ये अजूनही सुधारणेस मोठा वाव असून, त्यात भारताचा समावेश आहेच. जागतिक बँकेच्या मते, पाच वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांचे मृत्यू भारतात मोठय़ा संख्येने होत असून, प्रगतीच्या मार्गातील हा प्रमुख अडथळा आहे. भारताची या आघाडीवरील कामगिरी संतोषजनक नाही, असेही बँकेने म्हटले आहे. कुपोषणाच्या समस्येचे निराकरण योग्य प्रकारे होत आहे का, यावर कायम लक्ष ठेवणे गरजेचे आहे. तसेच बालविकासाच्या योजना भ्रष्टाचारमुक्त आणि गतिमान केल्या पाहिजेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या अहवालानुसार राज्यात एकाच महिन्यात एकूण १ हजार २३६ बालमृत्यूंची नोंद झाली आहे! त्यातील शून्य ते एक वयोगटातील (अर्भकमृत्यू) मुलांची संख्या ९१६ असून एक ते पाच वर्षांतील बालमृत्यू ३२० आहेत. राज्यातील ७९ हजार ६१९ मुले तीव्र कुपोषित गटात असून या मुलांना वेळीच पोषक आहार मिळणे गरजेचे आहे, तो योग्य वेळी मिळाला नाही तर या मुलांवरही मृत्यूची टांगती तलवार आहे. कमी वजनांच्या मुलांची राज्यातील महिन्यातील संख्या पाच लाख ५२ हजार ७४६ इतकी नोंदवण्यात आली आहे. पाच वर्षे

किंवा त्याहून अधिक वयाच्या मुलांमध्ये असणा-या कुपोषणाबाबत धक्कादायक आकडेवारी उपलब्ध आहे. जीवनसत्त्वयुक्त आहार भारतात केवळ ५३ टक्के मुलांनाच मिळू शकतो. म्हणजेच ४७ टक्के मुलांना वाढीसाठी योग्य आहारच मिळत नाही. ही अत्यंत प्राथमिक गरज पूर्ण होत नसल्यामुळे लहान वयातच मुले कुपोषणाची शिकार ठरतात. यातील अनेक मुलांचा मृत्यू होतो तर उर्वरित मुले पुढील आयुष्याला सामोरे जाण्यास शारीरिकदृष्ट्या सक्षम राहत नाहीत. आयोडिनयुक्त मिठाचा वापर वाढविण्यासाठीच्या जाहिराती सरकारच्या माध्यमातून पूर्वीपासून केल्या जात आहेत. तथापि, आजही ७१ टक्के घरांमधील मुलांना आयोडिनयुक्त मीठ उपलब्ध होऊ शकत नाही. आईचे दूध नियमितपणे मिळणारी मुले भारतात ७७ टक्के आहेत. याचा अर्थ २३ टक्के मुलांना आईच्या दुधाचे पोषण मिळत नाही. म्हणजेच, तितक्या संख्येने माता कुपोषित आहेत. न्यूमोनियासारख्या जीवघेण्या आजारांना बळी पडू शकतील, अशी शारीरिक स्थिती असलेल्या मुलांची संख्या आपल्या देशात तब्बल ६९ टक्के आहे. स्वच्छतेची सुविधा उपलब्ध असणाऱ्या नागरिकांचे प्रमाण आपल्या देशात केवळ ३६ टक्के आहे. याचा अर्थ, ६४ टक्के लोक अस्वच्छ, दुर्गंधीयुक्त आणि अनारोग्याने व्यापलेल्या परिसरात राहतात. जागतिक संस्था, संघटनांनी दिलेल्या अहवालांवर सरकारने तातडीने कार्यवाही करायला हवी. कुपोषणाची समस्या जर नेपाळ, बांगलादेशपेक्षा भारतात बिकट असेल, तर या विषयाकडे प्राधान्याने लक्ष पुरवायला हवे.

ग्राम बाल विकास केंद्रे

याबाबत जिल्हा माहिती कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी शासनाने गेल्या काही वर्षात विविध उपाययोजना केल्या आहेत. कुपोषणावर मात करण्यासाठी पूरक पोषण आहार देणे आणि वेळीच आवश्यक आरोग्य सेवा पुरविणे या दोन्ही महत्वाच्या बाबी आहेत. किंबहुना पूरक पोषण आहार आणि आरोग्य सेवा या दोन्ही एकत्रितपणे आणि समन्वयाने पुरविल्या तरच हा प्रश्न सोडविता येईल.

प्रत्येक कुपोषित बालकावर जाणिवपूर्वक उपाययोजना करणे आवश्यक असते. ही उपाययोजना अंगणवाडी केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा आरोग्य रुगणालय, स्त्री रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालय या विविध पातळीवर करण्याची आवश्यकता असते, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. म्हणून अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्र स्थापन करुन सॅम **(SM²)** उपचार करण्याची योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. यापूर्वी केंद्र शासनाच्या निधीतून राज्यात ग्राम बाल विकास केंद्र **(VCDC)** योजना आरोग्य विभागाकडून सुरु होती. यासाठी केंद्राकडून मिळणारा निधी बंद झाल्याने सदरची योजना राज्यात बंद करण्यात आली होती. त्याअनुषंगाने आदिवासी क्षेत्रातील लहान बालकांच्या कुपोषणावर प्रभावीपणे मात करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्र योजना सुरु करुन अंमलबजावणी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता शासन निर्णय नुसार देण्यात आली आहे.

राज्यातील आदिवासी क्षेत्रात ग्राम बाल विकास केंद्र योजना राबविण्यासाठी अपेक्षित रु.१७.११ कोटी एवढी रक्कम प्रदान करण्यास शासनाने मान्यता दिली होती आणि ग्राम बाल विकास केंद्र ही योजना २०१६-१७ गृहीत धरून पुढील तीन व आर्थिक वर्षांकरिता सुरू राहील. तदनंतर या योजनेच्या फलनिष्पत्ती व मूल्यमापनाच्या आधारावर पुढील निर्णय घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

योजनेचे स्वरूप व अंमलबजावणी

- ग्राम बाल विकास केंद्र योजनेचे संनियंत्रण अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे राहतील. एका केंद्रात जास्तीत जास्त १५ सॅम बालकांचा समावेश राहील.
- अंगणवाडीसेविका सहा महिन्यांपासून सहा वर्षांपर्यंतच्या बालकांची उंची घेऊन नोंदवही जतन करतील आणि सॅम बालके तातडीने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणली जातील.
- पुढील ४८ तासांच्या आत प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी ते बालक सॅम श्रेणीतील आहे किंवा नाही याबाबत दाखला देतील व त्यानंतरच सॅम बालकाला ग्राम बाल विकास केंद्रात दाखल करण्यात येईल.
- दुसऱ्या दिवशी आशा वर्कर ग्राम बाल विकास केंद्राला भेट देतील व आठवड्यातून एकदा ए.एन.एम./प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी ग्राम बाल विकास केंद्राला भेट देतील व सर्व बालकांची तपासणी/चाचणी करतील. ज्या बालकांमध्ये वाढ/सुधारणा दिसणार नाही त्यांच्या बाबतीत पुढील वैद्यकीय उपचार केले जातील.
- अंगणवाडीसेविका बालकांची दरमहा वजन आणि उंची घेवून बालकांची वर्गवारी साधारण, कुपोषित आणि अति कुपोषित (NORML, MM² SM²) अशी करतील.
- बालकास ग्राम बाल विकास केंद्रात दाखल केल्यानंतर सकाळी ०८ ते दुपारी १२ तसेच सायंकाळी ४ ते ७ या वेळेत उपचार केले जातील. त्या बालकांना व त्यांच्या पालकांना पुढील ३० दिवस सलगपणे अंगणवाडीत यावे लागेल.
- अंगणवाडीसेविका ग्राम बाल विकास केंद्र चालवतील व बालकांना, अंगणवाडीतून एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत दिला जाणारा सकाळचा नाश्ता तसेच पूरक पोषण आहार या व्यतिरिक्त ३ वेळा असा दिवसातून पाच वेळा आहार शिजवून उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी अंगणवाडीसेविका यांची राहणार आहे.
- त्याशिवाय या मुलांची दर आठवड्याला वैद्यकीय तपासणी अंगणवाडीस्तरावर केली जाईल.
- अंगणवाडीसेविका/आशा वर्कर दर आठवड्याला SM² बालकांच्या तब्येतीतील तपशिल जतन करतील.
- SM² बालकांचा सांभाळ करण्यासाठी जी महिला/पालक सोबत येईल तिला/त्याला बुडीत मजुरी दिली जाईल, शिवाय एक वेळचा जेवणाचा खर्चही दिला जाईल. प्रत्येक बालकाची ग्राम बाल विकास केंद्रातील भरती जास्तीत जास्त एक महिन्यासाठीच राहील. नंतर त्याला ए.एन.एम./प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर अंगणवाडी सेविकेमार्फत ग्राम बाल विकास केंद्रामधून मुक्त करण्यात येईल. तदनंतर पुढील सहा महिन्यांपर्यंत दर आठवड्याला अंगणवाडीसेविका व आशा वर्कर गृह भेटी देतील व बालकाच्या प्रकृतीवर लक्ष दिले जाईल.

- SM² बालकाच्या तब्येतीत सुधारणा होत नसल्यास प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत संदर्भ रुग्ण म्हणून दखल घेतली जाईल.
- ग्राम बाल विकास केंद्र योजना कार्यान्वित करण्यासाठी अंगणवाडी केंद्राला दरवर्षी नियमित खर्च दिला जाईल. सुशोभिकरण, फलक तक्ता, उंची-वजन तक्ता इ.खरेदी करण्यासाठी तो वापरण्यात येईल.
- ग्राम बाल विकास केंद्रामध्ये जास्त तासासाठी काम करण्याबद्दल अंगणवाडीसेविकेला वाढीव मानधन, मजुरी व इंधन दिले जाईल.
- अंगणवाडीसेविका तसेच आशा वर्करकडून ड्व् बालकांसोबतच्या पालकांचे समुपदेशन/प्रबोधन करुन बालकांची काळजी घेण्याबाबतच्या, पोषण आहार तसेच आरोग्य व आहार विषयक चुकीच्या सवयींमध्ये सुधारणा/बदल करण्याबाबत अवगत केले जाईल.
- या योजनेंतर्गत सर्व SM² बालके/मातांना/काळजी वाहकास सर्व सुविधा आधार दिल्या जातील.
- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरविण्यात येणारी सेवा आणि सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नियमित चाचणी, औषधी उपलब्धता यांची सांगड घालून ग्राम बाल विकास केंद्रामार्फत उपाययोजना केली जाईल.

कुपोषणाबाबत शासनाच्या उपाययोजना

- **मुंबईत तपासणी शिबिरे :**
जसलोक, हिंदुजा, वाडिया व ग्लोबल हॉस्पिटल येथील बालरोग तज्ज्ञांमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय तपासणी शिबिरांचे आयोजन केले आहे. VCDC मध्ये प्रत्येक बालकास RUTF (Ready to Use Therapeutic Food) देणेची व्यवस्था करणेत आली आहे. (यासाठी तरतुद CSR निधीतून) पुढील संपूर्ण वर्षासाठी ०-६ वयोगटातील सर्व बालकांसाठी अंगणवाडीत देण्यात येणाऱ्या पोषण आहाराव्यतिरिक्त अतिरिक्त पोषण आहार (aditional Nutritional Intervention) देण्याचे नियोजन आहे.

- **कोकणात ग्राम बाल विकास केंद्र, बाल उपचार केंद्र व पोषण पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून कालबद्ध उपाययोजना :**
कोकणातील कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी शासनस्तरावरून विविध उपक्रम व योजना राबविण्यात येत आहेत. कोकणात ग्राम बाल विकास केंद्र, बाल उपचार केंद्र व पोषण पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून कुपोषणाचे प्रमाण रोखण्यासाठी कालबद्ध उपाययोजना करण्यात येत आहेत.पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या चार तालुक्यातील ०-६ वर्षातील सर्व मुलांचे सर्वे क्षण सुरू आहे. प्रथम स्तरामध्ये अंगणवाडी सेविकेमार्फत तर व्दितीय स्तरामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत या सर्वेक्षणासाठी १११ उपकेंद्रांवर १११ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. सर्वेक्षणाअंती SM² व MM² बालकांची यादी अद्ययावत करण्यात आले. या यादीतील बालके त्यांच्या श्रेणीनुसार VCDC, CTC किंवा NRC म ध्ये दाखल केली जात आहेत. VCDC साठी जिल्हास्तरावर नावीन्यपूर्ण योजनेतून रुपये १.२० कोटीची तरतूद केली. याव्यतिरिक्त प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर CTC सुरु करण्यात आले. जिल्हास्तरावर चार बालरोगतज्ज्ञ उपलब्ध असून त्यांच्यामार्फत चार तालुक्यांमध्ये प्रत्येक गुरुवारी ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी तपासणी शिबिरांचे आयोजन सुरु आहे.

- **शाश्वत उपजीविकेसाठी रोजगार :**
जव्हार, मोखाडा व विक्रमगड भागातील कुपोषणास सर्वाधिक कारणीभूत घटक शाश्वत उपजीविकेचा अभाव (Lack of sustainable livelihood) हे आहे. यावर मात करण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या. नरेगा, जलयुक्त शिवार अभियान व इतर जलसंधारणाच्या योजनेतून लघुसिंचन सुविधा उपलब्ध करणे, कौशल्य विकास कार्यक्रम (जव्हार-मोखाडा तालुक्यातील २९५ उमेदवारांचे प्रशिक्षण वर्ग सुरु व या व्यतिरिक्त पुढील दोन महिन्यांत ८०० उमेदवारांना प्रशिक्षण व रोजगार उपलब्ध होण्याची शाश्वती), प्रबोधन व समुपदेशन गरोदर व स्तनदा माता तसेच सर्व नागरिकांमध्ये प्रबोधन करण्याबाबत विशेष मोहीम सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांचा व्यापक प्रमाणावर वापर होत आहे.

- **भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना :**
अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांमधील, स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून म्हणजेच प्राथमिक आरोग्य केंद्र व जवळच्या अंगणवाडी/मिनी अंगणवाडीमध्ये नोंदणी झाल्यापासून गरोदर स्त्रियांना बाळंतपणापर्यंत व स्तनदा मातेस बाळंतपणानंतर सहा महिने एक वेळ चौरस आहार देण्यात येतो. तलासरी, जव्हार, जव्हार २, विक्रमगड, मोखाडा, डहाणू, कासा, वाडा, वाडा-२, पालघर, मनोर, वसई -२ ही गावे या प्रकल्पांसाठी मंजूर करण्यात आली आहेत. योजनेच्या टप्पा दोनमध्ये कमी वजनाची बालके, वाढ खुंटलेली मुले (Stunting), उंचीच्या प्रमाणात कमी वजन असलेली बालके (Wasting) इत्यादी समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात असलेल्या अंगणवाड्यांतर्गत ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व शाकाहारी मुलांना दोन केळी, मांसाहारी मुलांना एक उकडलेले अंडे आठवड्यातून चार वेळा म्हणजेच महिन्यातून १६ दिवस एक वेळचा अतिरिक्त आहार पुरविण्यात येतो.

लक्ष्मीची पाऊले

सुवर्णा दामले

अपार कष्टांमुळे व वेळीच घेतलेल्या निर्णयांमुळे लक्ष्मीबाईंची प्रगती झाली आहे. कोणाचीही मदत नसताना केवळ एकटीच्या भरवशावर लक्ष्मीबाईंनी उचललेले एक धाडसी पाऊल आज त्यांच्या व मुलांच्या उज्ज्वल भविष्याची वाट बनले आहे.

शेतकरी कुटुंबाची परवड होण्यासाठी कुटुंबात आत्महत्या होणेच गरजेचे असते असे नाही. ग्रामीण भागातील अडचणी आजही अनंत आहेत. शहरी भागात मिळणाऱ्या सेवा-सुविधा ग्रामीण भागात आजही कमी प्रमाणात किंवा अजिबातच पोहोचलेल्या नाहीत, असे चित्र आहे. त्यातही विदर्भातील ग्रामीण भागातील चित्र आणखीनच चिंताक्रांत करणारे आहेत. मूलभूत सेवा-सुविधाही या ठिकाणी उपलब्ध नाहीत, मग रोजगार कसे मिळणार? या रोजगारापायीच मग स्थलांतर नशिबी येते. लक्ष्मीबाईंनाही असेच स्थलांतर करावे लागले. मनातली अतूट हिंमत आणि कष्ट करण्याची तयारी या जोरावर लक्ष्मीबाईंनी नशिबाची एक अवघड परीक्षा पार केली आहे.

संकटे आली की ती चारही बाजूंनी येतात व आधी आलेल्या संकटातून बाहेर पडता-पडता दुसरी संकटे समोर उभी असतात, याची पूरेपूर प्रचिती अकोला जिल्ह्यातील एका छोट्याशा गावात राहणाऱ्या लक्ष्मी गावंडे (बदललेले नाव) यांना आली आहे. शेतकरी कुटुंबात लग्न होऊन आल्यानंतर नवरा, दोन मुले,

सासू-सासरे व एक अपंग दीर असे लक्ष्मी यांचे कुटुंब. घरच्यांचे करण्यांत लक्ष्मी गावंडे यांची लग्नानंतरची दहा वर्षे कशी निघून गेली ते कळलेही नाही. सासरे व नवरा यांच्या भरवशावर शेती आणि घर चालत होते. इतर अनेक अल्प-भूधारक शेतकऱ्यांप्रमाणेच लक्ष्मीच्या सासऱ्यांनीदेखील कर्ज घेतले होते. शेतीतून मिळणारे उत्पन्न पुरेसे नसल्यामुळे कर्ज आणि व्याजाचा भार वाढतच होता. अखेर, कर्ज, नापिकी, अपंग मुलाची जबाबदारी याला कंटाळून लक्ष्मीच्या सासऱ्यांनी विहिरीत उडी मारून जीवन संपविले.

वडिलांच्या आत्महत्येनंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी लक्ष्मीच्या नवऱ्यावर आली. ते देखील अत्यंत तणावाखाली व चिंतेत कसातरी घराचा गाढा ढकलीत होते. अशातच लक्ष्मीचा नवरा सतत आजारी राहू लागला. अनेक डॉक्टरांकडे गेल्यावर व तपासण्या केल्यावर त्यांना मानेचा कॅन्सर असल्याचे निदान झाले व त्यांच्यासकट कुटुंबातील सर्वांनाच आयुष्यात समोर केवळ अंधार आहे, असे दिसू लागले. लक्ष्मी आणि तिच्या सासूने हिंमत करून लक्ष्मीच्या नवऱ्याला मुंबईच्या टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये नेले. मात्र तिथे राहून उपचार घेणे हे त्यांना परवडणारे नव्हते. मग पुन्हा गावी येऊन त्यांनी घरगुती व तात्पुरते उपचार केले. योग्य उपचारांअभावी कॅन्सरशी दहा महिने झुंज देऊन लक्ष्मीच्या नवऱ्याची प्राणज्योत मालवली. आता कुटुंबातील म्हातारी सासू, अपंग दीर व दोन लहान मुले यांची काळजी लक्ष्मीच्या शिरावर आली व त्यांनी अंगणवाडीत खिचडी शिजविण्याचे काम सुरू केले. कुटुंबाचा खर्च कसा तरी भागत होता. ही सगळी परवड व एका पाठोपाठ बसलेले धक्के सहन न झाल्यामुळे लक्ष्मीच्या सासूबाईदेखील मुलाच्या मृत्यूनंतर आठ महिन्यांतच मरण पावल्या.

लक्ष्मीबाईंचे खिचडी शिजविण्याचे काम सुरूच होते, मात्र या कामाचे मानधन चार-चार महिने मिळत नव्हते, म्हणून जोडीला छोटेसे दुकान टाकून बघितले. शेतात मजुरीही करून बघितली. गावात राहून यापेक्षा अधिक काहीच करता येण्यासारखे नव्हते. मग लक्ष्मीबाईंनी दोन मुलांना घेऊन अकोला शहर गाठले. तिथे एक खोली भाडयाने घेऊन त्या राहू लागल्या. त्या जेवणाचे डबे बनविण्याचे काम करू लागल्या. सुदैवाने त्यांना आता पेन्शन मिळू लागली होते. परिस्थितीचे गांभीर्य मुलांनाही जाणवू लागले होते. मुलगी पोळ्या करायला तर मुलगा डबे पोहोचवायला मदत करू लागला. आपल्या लहान-लहान मुलांकडून कामे करून घ्यायचे लक्ष्मीबाईंना जीवावर येत असे, पण त्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नव्हता. कामाची गुणवत्ता टिकविल्यामुळे लक्ष्मीबाईंना अधिकाधिक कामे मिळू लागली व त्यांनी मदतीला माणसे ठेवली. मुलांवरील कामाचे ओझे कमी केले. आपल्या व्यवसायासाठी त्यांनी दीड लाख रुपये कर्जाऊ घेतले व स्वयंपाकासाठी आवश्यक सामानांची खरेदी केली. सुरुवातीला एका भाडयाच्या खोलीत राहणाऱ्या लक्ष्मीबाईंनी आज अकोल्यात स्वतःचा फ्लॅट खरेदी केला आहे व त्याच्या कर्जाचे हप्ते त्या फेडत आहेत. तसेच इतर चार बायकांनादेखील त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

सासू गेल्यानंतर चार वर्षांत झालेली लक्ष्मीबाईंची प्रगती ही त्यांनी केलेल्या अपार कष्टांमुळे व वेळीच घेतलेल्या निर्णयांमुळे झाली आहे. कोणाचीही मदत नसतांना केवळ एकटीच्या भरोशवर उचललेले लक्ष्मीबाईंचे एक धाडसी पाऊल आज त्यांच्या व मुलांच्या उज्ज्वल भविष्याची वाट बनले आहे.

गावकारभारणींची इर्जिक

भीम रासकर

राजकारणाच्या पंचायतीत- पती, परिवार, विरोधक, अधिकारी व पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधतांना त्यांचे वादात रूपांतर होऊ नये, तो सुसंवाद व्हावा असा कारभारणीं नेहमी प्रयत्न करतात. परंतु, असभ्यता ओलांडली गेल्यास; त्या साम-दाम-दंड भेद याहून वेगळ्या रणनीतीही शोधतात हे खरं! या महिलांनी सत्ता मंडळांना भेदायला सुरुवात नक्की केली आहे!

इर्जिक म्हणजे काय?

उत्तर प्रदेशातील आपल्या दोन खासदारांनी, नुकतीच 'राष्ट्रीय पुरुष आयोग' स्थापन करण्याची मागणी केली आहे. आपणाला प्रश्न पडू शकतो की, पुरुषांवरील अत्याचार वाढलेत की काय? पुरुषांना महिला घराबाहेर काढू लागल्या आहेत, की चालती हो या घरातून हे वाक्य बाईलाच भांडण झाल्यावर नवऱ्याकडून, सासू-सासऱ्यांकडून व नंतर न जाणो मुलगा व सुनेकडूनही ऐकायला मिळते. बऱ्याचदा प्रत्यक्षात असे घडतेही, पण असे का घडते? बाईचा घर, जमीन अशा प्रकारच्या संपत्तीवर कागदोपत्री अधिकार नसल्याने ती कायम निराधार असते. यामुळे ती मानसिक, शारीरिक अत्याचाराला बळी पडते. बाईचा व पुरुषाचा घरावर समान हक्क आहे का? राज्यघटनेनुसार आपले उत्तर 'आहे' असे आहे. मग तो हक्क कुठे व कशात आहे? याचे उत्तर मात्र आपल्याकडे वास्तवात नाही!

मुळात बाईचा व पुरुषाचा घरावर समान अधिकार असतो, असावा. घरासाठी बाईही पुरुषाइतकीच किंवा त्याच्यापेक्षा अनेक पटीने स्वतःचे श्रम, प्रेम व वेळ खर्च करत असते. त्या घराची सात-बारावर मालकी मात्र त्या पुरुषाकडेच असते. मुलगी सासरी जाणार असल्याने लग्नाआधी तिला सांपत्तिक अधिकार मिळत नाही आणि लग्नानंतरही तिला घर, जमीन यांचा कागदोपत्री अधिकार दिला जात नसल्यामुळे अजाणतेपणाने किंवा कळत-नकळत घरातील पुरुषांकडून तिच्यावर पावलोपावली वाटपाबाबत अन्याय होतो. अजूनही बाईला घरात पुरुषाइतकीच समानतेची वागणूक मिळत नाही. बाईला दुय्यम स्थान देणाऱ्या या मानसिकतेच्या मुळाशी 'मालकी' हे कारण तर नाही ना? बाईला संपत्तीत समान हक्क न मिळाल्यामुळे मानसिक-सामाजिक समानता रूप घेत नाही.

पतीच्या संपत्तीत पत्नीला समान अधिकार मिळणे, ही पायाभूत गरज आहे. स्त्री-पुरुष समानतेसाठी सामाजिक व राजकीय स्तरांवर प्रयत्न करताना,

या सर्वांचे मूळ असलेल्या अर्थकारण व सांपत्तिक मालकीला हात घालणे गरजेचे आहे. शिक्षण, राजकारण, नोकरी यामध्ये स्त्रियांना आरक्षण देऊन आपण समानतेच्या दृष्टीने 'धोरणात्मक प्रयत्न'केले, पण आर्थिक व सांपत्तिक समानतेच्या दृष्टीने आपली धोरणे व कायदे तितकेसे पोषक नाहीत. स्त्रीला संपत्तीत हक्क देण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलण्याची गरज आहे. या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून पतीचा व पत्नीचा घरावर संयुक्त हक्क असणे हे धोरण न्यायोचित आहे. यासाठी महिला राजसत्ता आंदोलन गेल्या बारा वर्षांपासून 'संयुक्त घर मालकीसाठी, इर्जिकेसारखे' हे अभियान यशस्वीरीत्या राबवत आहे.

इर्जिक...याचा अर्थ सर्व वस्तीने मिळून सामूहिक ताकद लावून गरीब शेतकऱ्याला शेतीत मदत करायची. एकाच दिवशी गावातूनच १५-२० नांगर येतात व शेताची मशागत होते. त्याबदल्यात दुपारचे जेवण दिले, की काम झाले! इर्जिक म्हणजे सर्वांनी मिळून परस्परांचे प्रश्न सोडवून टाकायचे!

याच पद्धतीने आंदोलनासोबत असलेल्या कारभारणी गावचे मन तयार करतात. बाईलाही मालक करतात. ती एकटीच मालकीण होत नाही. ते घर बनते संयुक्त मालकीचे!

संयुक्त घरमालकीचा कायदा हवा

स्त्री-पुरुषांच्या आर्थिक हक्कांमध्ये समानता आल्याशिवाय (महिलांना संपत्तीत हक्क दिल्याशिवाय) दीर्घकालीन समानता येणे कठीण आहे. लग्नाआधी तसेच लग्नानंतरही महिलांना संपत्तीत अधिकार नसल्याने त्यांना कोणत्याच प्रकारची आर्थिक सुरक्षा अस्तित्वात नाही. कुठल्याही समाजाचा पाया हा अर्थकारणावर अवलंबून असतो. एखाद्या व्यक्तीचे समाजातील प्रतिष्ठतेचे व सुरक्षेचे गणित हे त्या व्यक्तीच्या सांपत्तिक व आर्थिक सूत्रांवर अवलंबून असते. त्यामुळे संपत्तीत महिलांना त्यांचे अधिकार मिळवून देणे आवश्यक आहे. महिलांच्या संपत्तीतील अधिकारांच्या दृष्टीने उचललेले पहिले पाऊल म्हणजे 'संयुक्त घरमालकी'.

महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी त्यांना पतीच्या मालमत्तेत हक्क देणे ही मूलभूत गरज आहे. यासाठी त्यांच्या असलेल्या (राहत्या) घराची नोंद पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे होणे गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने दिनांक २० नोव्हेंबर २००३ रोजी परिपत्रक काढले आहे. मात्र या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संयुक्त घरमालकी हा 'कायदा' व्हावा, अशी महिला राजसत्ता आंदोलनाची भूमिका आहे.

महिला राजसत्ता आंदोलन व कुसुमताई चौधरी महिला कल्याणी यांच्यामार्फत सातारा जिह्यातील जावळी तालुक्यातील दहा गावांमध्ये 'संयुक्त घर मालकी- वास्तव व परिणाम' असा अभ्यास करण्यात आला. महिला राजसत्ता आंदोलनाने संयुक्त घरमालकी हे अभियान राबवलेल्या गावांचा हा अभ्यास आहे. या अभ्यासातून असे दिसून आले की, संयुक्त घरमालकीमुळे अनेक सकारात्मक बदल घडून आले. कागदावर व घराच्या दरवाजांवर पुरुषांच्या बरोबरीने महिलांचे नाव लागल्याने महिलांचा आत्मविश्वास वाढला आहे. महिलांवर होणाऱ्या शारीरिक व मानसिक अत्याचारांत घट झाल्याचे जाणवत आहे. संयुक्त घरमालकीमुळे स्त्री-पुरुष समानतेबाबत समाजात आदर वाढला आहे. गावपातळीवरील शासकीय कर्मचारी, तालुकास्तरीय शासकीय कर्मचारी तसेच तालुकास्तरीय राजकीय प्रतिनिधींचा या अभियानाला सकारात्मक प्रतिसाद मिळत

आहे.

पतीच्या संपत्तीत पत्नीला समान हक्क असणे ही मूलभूत गरज आहे. त्यामुळे संयुक्त घरमालकीही मागणी न्यायोचित आहे. महिला सक्षमीकरणासाठी महिलांना संपत्तीत समान अधिकार देणाऱ्या या परिपत्रकाचे कायद्यात रूपांतर व्हावे, अशी महिला राजसत्ता आंदोलनाची मागणी आहे.

आम्ही दोघे, घरमालकी दोघांची

संघमा म्हणजे 'संयुक्त घरमालकी' याबाबत साताऱ्यातील ग्रामस्थ मंडळींनी खूप परखड मते व्यक्त केली;काय आहे त्यांचे म्हणणे? आघाडीवरचे सातारकर नेमके काय म्हणतात?

तुकाराम शेलाटकर (पती) म्हणतात, शासनाच्या जी.आर.नंतर संयुक्त घरमालकी जावळीमध्ये राबवण्यात आली. अशा प्रकारे संपूर्ण महाराष्ट्राभर हे व्हावे, अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे.

लता शेलाटकर (पत्नी) यांच्या मते, आम्हाला आमच्या सरपंच शारदाताईंनी संघमाबद्दल माहिती दिली. घरावर दोघांचेही नाव लावण्याबद्दल सांगितले. मग आम्ही संपूर्ण गावातील घरांवर पती-पत्नींची नावे टाकून घेतली.

सुवर्णाताई जुनघरे (माजी सरपंच-सावली) या म्हणतात, सरपंच झाल्यानंतर मला संघमाबद्दल माहीत झाले. मग आम्ही पूर्ण गावातील घरांवर पती-पत्नी दोघांची नावे लावून घेतली. हे करताना सुरुवातीला पुरुषांचा थोडा विरोध झाला. महिलांच्या नावावर कशाला पाहिजे घर? असे प्रश्न आले. मग आम्ही ग्रामसभा घेतली. त्यात सर्वांना समजावून सांगितले, संघमाचे महत्त्व पटवून दिले. मग त्यांनी आम्हाला संघमासाठी पाठिंबा दिला. आतापर्यंत जरा काही झाले तर, महिलांना 'चल हो घराबाहेर', जरा काही झाले तर, 'घर काही तुझे नाही', असे सांगितले जायचे. पण आता संघमामुळे म हिलासुद्धा हक्काने म्हणू शकतात की, घर काय फक्त तुमचेच नाही. आता आमचासुद्धा घरावर अधिकार आहे. आम्ही घरातून बाहेर पडणार नाही.

२००३ साली शासनाचा जीआर आला आहे. त्यानुसार घर संघमा करणे कायद्याने बंधनकारक आहे. २००८ ला माझी निवड झाली. मी महिलांना घर संघमाचे करण्याबद्दल सांगितले. याबाबत त्यांचे मतही विचारले. सर्व महिलांनी घर संघमाचे करायला होकार दिला. घरे पती-पत्नींच्या नावावर झाली. ग्रामसेवकाने ८-अ उताऱ्यावर पती-पत्नी दोघांच्या नावाची नोंद केली. आम्ही गावातील घरांवर दोघांच्या नावाच्या पाट्या लावल्या. जेणेकरून, महिलांना पाट्या वाचून माहिती झाले पाहिजे की, दोघांच्याही नावावर घर झाले आहे. कारण महिला ग्रामपंचायतीत जात नाहीत. त्यामुळे त्यांना कसे कळणार की, ८-अ च्या उताऱ्यावर त्यांच्या नावाची नोंद झाली आहे. ज्यावेळी घरावर पाट्या लावल्या, तेव्हा महिलांचा विश्वास बसला की, खरेच घरआपल्याही नावावर झाले आहे.

त्यामुळे खूप फरक पडला. उदा. ज्या महिलेचा नवरा दारू पिऊन येऊन त्यांना हाकलून द्यायचा, त्यांचा मोठा प्रश्न होता. पण आता घर दोघांच्याही नावावर झाले, ८ अ च्या उताऱ्यावरही दोघांचे नाव लागले. त्यामुळे महिलांची भीती कमी झाली. आपल्याला आपला नवरा घरातून हाकलून देणार नाही, याची जाणीव झाली.

संघमामुळे समान न्याय मिळाला आहे. घरावरचा महिलांचा हक्क त्यांना मिळाला. लोकांनाही हे पटलं आहे.

सोपान दुंदळेच्या मते, आमच्याकडे नव्वद टक्के पुरुष कामानिमित्त इतर शहरांत आहेत. घरावर हक्क महिलांचाच आहे, पण तो लेखी नव्हता. संघमामुळे महिला समाधानी आहेत. त्या त्यांचा हक्क ठणकावून घ्यायला लागल्या आहेत. पूर्वी पुरुष सहज बोलून जायचे चल घराबाहेर हो. आता महिला सांगू शकते की, हे घर फक्त तुमचेच नाही. आता माझ्याही नावे हे घर आहे. माझाही घरावर समान हक्क आहे.

संघमामुळे महिलांवरील अत्याचारांत पन्नास ते साठ टक्क्यांनी घट झाली आहे. संयुक्त जमीन मालकी झाली तर शंभर टक्के फरक पडल्याशिवाय राहणार नाही. संयुक्त जमीन मालकीला माझा पाठिंबा आहे. त्यासाठी मी आमच्या गावात, इतर गावांत, तालुका तसेच जिल्हापातळीवर पुढाकार घेईन.

संयुक्त घरमालकीच्या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाल्यमुळे राज्यपालांनी पुढाकार घेऊन त्याबाबत कायदा करावा, असे महिलावर्गाला नक्की वाटते. कसा असावा हा संयुक्त घरम ालकीच्या कायद्याचा मसुदा?

मा. राज्यपालांना आवाहन

महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी व त्यांचा आत्मसन्मान वाढवण्यासाठी महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम २६०३/प्र. क्र. २०६८/पंरा-४ ह्याप्रमाणे ग्रामीण भागातील घरांची नोंदणी पती आणि पत्नीच्या संयुक्त नावे करणे आवश्यक आहे. ह्या परिपत्रकाप्रमाणे महिलांना पतीच्या मालमत्तेत समान हक्क मिळवून दिला आहे; परंतु हा हक्क फक्त ग्रामीण भागातील महिलांपुरताच मर्यादित आहे. तो सर्वच महिलांना मिळावा ह्यासाठी त्याचे कायद्यात रूपांतर होणे गरजेचे आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार महिलांच्या घरकामाचे योगदान लक्षात घेतले जात नाही. कुटुंबाची मालमत्ता उभारताना तिने श्रमाने दिलेल्या सहयोगाची दखल घेतली जात नाही. कायदेशीर विभक्त होण्याची वेळ आली तर पत्नीला केवळ पोटगीचा व स्त्रीधनाचा अधिकार कायदा देतो, परंतु पतीच्या मालमत्तेत मात्र अधिकार मिळत नाही. लग्नानंतर महिलांना सुरक्षितता व आत्मसन्मान मिळवून देण्याच्या दृष्टीने त्यांना पतीच्या मालमत्तेत समान हक्क कायद्याने मिळवून देणे ही आमची मागणी आहे.

महाराष्ट्र सरकारने असा कायदा अस्तित्वात आणण्यासाठी काही ठोस पावले उचलली आहेत. त्यासंदर्भातील कायद्यातील तरतुदींची काही ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

- पत्नीला पतीच्या मालमत्तेत समान हक्क मिळेल.
- पतीची मालमत्ता म्हणजे त्याची स्थावर तसेच जंगम स्वरूपाची मालमत्ता, ज्यात त्याचा एकत्र कुटुंबातील जमिनीचा हक्क,त्याचा एकत्र कुटुंबाच्या व्यवसायातील हक्क, त्याचा भविष्य निर्वाह निधी, सेवानिवृत्ती उपदान (Gratuity) यांचाही समावेश असेल.
- पतीला त्याची मालमत्ता विकताना पत्नीची संमती घेणे गरजेचे आहे. तिच्या संमतीशिवाय केलेले मालमत्तेविषयीचे व्यवहार रद्दबादल ठरतील.
- जर पती स्वतःची मालमत्ता पत्नीचा हक्क डावलून विकू पाहत असेल तर पत्नी न्यायालयात दाद मागू शकते.
- पत्नीला पतीच्या मालमत्तेत अशा रीतीने कायदेशीररित्या समान हक्क मिळवून देणारा कायदा लवकरात लवकर अस्तित्वात यावा, ही विनंती.
- याची सुरुवात म्हणून परिपत्रकाचे संपूर्ण महाराष्ट्राकरिता महिला धोरणांतर्गत कायदेशीर विधेयकात रूपांतर करून ते दोन्ही सभागृहांत मंजूर करून घ्यावे, असे नम्र आवाहन.

कर दोघांचे, घर दोघांचे

ज्या कामाला दोघांचे म्हणजे पती-पत्नीचे हात लागतात,त्यात दोघांना समान वाटा हवा. महाराष्ट्राने देशातील पहिले महिला धोरण निर्माण केले. तसेच,पहिली महिला सभा ही याच राज्याने देशात सर्वांच्या आधी केली. महिलांबाबत कायम समानतेची पावले उचलणारे हे राज्य संयुक्त मालमत्ता कायदाही लवकरात लवकर आणेल, परंतु हा कायदा आपोआप येणार नाही, पुरुषांची संमत्ती व महिलावर्गाच्या मागणीची गती या दोन्ही गोष्टी त्यासाठी गरजेच्या आहेत. कर आणि घर दोघांचे आहेच, परंतु ते समाजमान्यतेने मिळणे हे कायदामान्यते एवढेच महत्त्वाचे आहे.

नग्न सत्य...

गेल्या काही वर्षांत महिलाप्रधान चित्रपटांची संख्या हिंदी चित्रपटसृष्टीत वाढते आहे. महिलांच्या प्रश्नांकडे, समस्यांकडे संवेदनशीलतेनं पाहणारी एक नवी फळी चित्रपटसृष्टीत तयार झाली आहे. या चित्रपटांमुळं महिलांकडं पारंपरिक नजरेनं पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनही बदलत आहे. हा हळूहळू घडणारा बदलही आश्वासक आहे. अशा काही चित्रपटांचा परिचय या सदरातून आपण करून घेत आहोत. या वेळचा चित्रपट आहे 'न्यूड'...

अनिरुद्ध नगरकर

आपण सत्य व नग्नता या दोन्हीला घाबरतो; याचं कारण बहुतेकदा आपल्याच कर्मामुळं आपण या दोन्हींकडं डोळे भिडवून पाहण्याची क्षमता गमावून बसलेलो असतो. नग्नता हे एक प्रकारचं सत्य असतं आणि सत्यही अनेकदा नग्नच असतं. नग्नता आणि सत्य या दोन्ही गोष्टी नैसर्गिक असल्यामुळं स्वाभाविक असतात. मात्र, या गोष्टींना खंबीरपणे सामोरे जाण्यास आपण बहुतेकवेळा कचरत असतो. कारण आपल्याला त्याची भीती वाटते. नग्नतेचा संबंध सत्याशी असल्यामुळं आणि आपल्याला सत्याला डोळे भिडवायचे नसल्यामुळं आपण नग्नता दिसली, की दचकतो. आरडाओरड करतो. 'हे काही तरी वाईट आहे, घाणेरडं आहे,' असं बोंब ठोकून सांगू लागतो. खरी गोष्ट अशी, की आपण नग्न सत्याला घाबरतो!

आपल्या नकळत कुणी चारचौघांत आपले कपडे काढले आणि ते आपल्याला अचानक कळलं, तर जे काही होईल, ते 'न्यूड (चित्रा)' हा रवी जाधव दिग्दर्शित नवा मराठी चित्रपट पाहून आपल्याला होतं. सिनेमा संपल्यानंतर येणारं एक सुन्नपण सहन करावं लागतं. एखादी कलाकृती आपल्या जाणिवांना किती खोलवर हादरा देऊ शकते, हे समजतं. आपली एकूणच जगण्याविषयीची समज, आकलन यांना कुणी तरी आव्हान दिलंय, याची खात्री पटते आणि आपण मनोमन या कलाकृतीला दाद देतो.

रवी जाधव यांनी या कलाकृतीच्या माध्यमातून आपल्या समाजाच्या एकूणच कलाविषयक धारणांसमोर काही प्रश्न उपस्थित केले आहेत. कला म्हणजे काय, कलेचं आपल्या आयुष्यातलं प्रयोजन काय, आपण कलेचं काही देणं लागतो का अशा अनेक प्रश्नांना हा चित्रपट हात घालतो आणि त्याची यथायोग्य उत्तरंही देतो. ही उत्तरं सोपी, गुळमुळीत, सहज नाहीत. कानाखाली कुणी तरी सण्णकन

चपराक हाणावी, तशी ही उत्तरं समोर येतात आणि संवेदनशील मेंदूच्या ठिकऱ्या उडवतात. कलाकृतीशी जेव्हा प्रेक्षकांचं असं जैव नातं जडतं, तेव्हा ती कलाकृती फार उच्च दर्जा गाठते. 'न्यूड (चित्रा)' आपल्याला त्या प्रतीचा आनंद देतो.

वरवर पाहिलं तर ही यमुना (कल्याणी मुळे) या साध्यासुध्या बाईची गोष्ट. नवऱ्याच्या बाहेरख्यालीपणाला कंटाळून महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील छोट्या गावातून ही बाई आपल्या लहान्या या मुलाला (मदन देवधर) घेऊन मुंबईत मावशी चंद्राक्का (छाया कदम) हिच्याकडं येते. चंद्राक्का सर जे. जे. कला महाविद्यालयात सफाई कामगार म्हणून काम करत असते. पण खरं तर तिथं न्यूड मॉडेल म्हणून बसून ती अधिकचे पैसे कमावत असते. यमुनाला ती हेच काम करायला सांगते. आधी हे काम करायला सपशेल नकार देणारी यमुना मुलाच्या शिक्षणासाठी लागणारा पैसा मिळवण्यासाठी हे काम करायला तयार होते. हे काम करताना पहिल्यांदा तिची झालेली प्रचंड घालमेल दिग्दर्शक अत्यंत संवेदनशीलतेनं चित्रित करतो. 'तन तम्बुरा' या गाण्याच्या सुरावटींवर यमुना आपल्या देहावरील वस्त्रांच्या कैदेतून मुक्त होते, तशी जणू वर्षानुवर्षं तिच्यावर चढलेली रुढी-परंपरांची कळकट जळमटंही धुऊन निघतात.

यमुनाचा पुढचा सगळा संघर्ष, तिला तिथं भेटलेला तरुण चित्रकार, त्यानंतर एका बड्या व वादग्रस्त चित्रकाराकडं न्यूड मॉडेल म्हणून जाण्याची मिळालेली संधी, लहान्यालाही चित्रकलेची आवड निर्माण झालेली पाहून वाटलेली धास्ती, त्याला शिकायला लांब औरंगाबादला पाठविण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय आणि नंतर यमुनाची झालेली फरपट... हे सगळं उत्तरार्धात येतं. त्याच्या जोडीला शेवटाकडं येतं ते दिग्दर्शकाचं एक स्टेटमेंट! या क्लायमॅक्सच्या प्रसंगामुळं या संपूर्ण कलाकृतीला आवश्यक ती मजबूत 'फ्रेम' मिळाली आहे, हे नक्की.

रवी जाधव यांनी यात यमुनाची कथा सांगता सांगता अनेक कलाविषयक प्रश्नांना हात घातला आहे. एकूणच समाज म्हणून असलेली आजची विदारक स्थिती ते दाखवत राहतात. एके काळी प्रगल्भ कलाजाणिवा असलेला आपला समाज आज नग्न चित्रांच्या विरोधात निदर्शनं करतो, कलेचं मर्म समजून न घेता, मेंढरांच्या कळपासारखा प्रतिक्रिया देतो, या सगळ्यांमागची नेमकी कारणं काय असावीत, याचा शोध घेण्याचा प्रयत्न दिग्दर्शक करीत राहतो. चित्रसाक्षरता, किंवा एकूणच दृश्यसाक्षरता याबाबत आपण किती आणि का मागे आहोत, हे 'बिटवीन द लाइन्स' सांगत राहतो. नसीरुद्दीन शहा यांनी साकारलेली 'मलिकसाब' ही व्यक्तिरेखा थेट एम. एफ. हुसेन यांच्यावर बेतलेली आहे. या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून दिग्दर्शक कलावंतांची बाजू आपल्याला सांगतो. 'कपडा जिस्म पर पहनाया जाता है और हम अपने काम में रुह खोजने की कोशिश करते हैं' हा त्यांचा एव्हाना प्रसिद्ध झालेला संवाद याचंच निदर्शक आहे. एकूणच यमुना आणि मलिकसाब यांच्यातला तो प्रसंग आणि त्यातले संवाद जमून आले आहेत.

दिग्दर्शकासोबतच संवादलेखक सचिन कुंडलकर आणि छायाचित्रकार अमलेंदू चौधरी यांनाही या कलाकृतीचं तेवढंच श्रेय द्यायला हवं. विशेषत: अमलेंदूंच्या कॅमेऱ्यानं या कलाकृतीला आवश्यक असलेला कला आणि इतर रखरखीत जीवन यांचा विरोधाभास नेमका टिपलाय. झोपडपट्टीतील चंद्राक्कांचं घर आणि जे. जे. महाविद्यालयातील कलादालन या दोन्हींकडची त्यांची रंगसंगती पाहण्यासारखी आहे. सायली खरे यांच्या संगीताचाही उल्लेख करायला हवा.

कल्याणी मुळे या रंगभूमीवरील अभिनेत्रीचा हा दुसराच आणि मोठी भूमिका असलेला पहिलाच चित्रपट. मात्र, इथं त्यांनी यमुना जीव ओतून साकारली आहे. नवऱ्याच्या बाहेरख्यालीपणामुळं रडणारी-भेकणारी, गावाकडची गरीब स्त्री इथपासून मुंबईत येऊन मुलाच्या शिक्षणासाठी उभी राहणारी आत्मविश्वासू स्त्री म्हणजे अशा अनेक कष्टकरी स्त्रियांच्या जगण्याचं प्रातिनिधिक चित्रच. यमुनाच्या भूमिकेसाठी कल्याणी यांना खास दाद. दुसरी महत्त्वाची भूमिका चंद्राक्काची. छाया कदम या जाणत्या अभिनेत्रीची ताकद एव्हाना महाराष्ट्राला समजली आहे. या ताकदीला न्याय देणारी भूमिका त्यांना यात मिळाली आहे आणि त्यांनी तिचं सोनं केलं आहे. ओम भुतकर, मदन देवधर, श्रीकांत यादव, किशोर कदम यांनी छोट्या-मोठ्या भूमिकांमध्ये उत्तम साथ केली आहे.

काही कलाकृती या केवळ मनोरंजनासाठी पाहायच्या नसतात. त्या आपल्या मेंदूला खुराक देतात आणि त्या प्रक्रियेत आपल्याला समृद्ध करतात. 'न्यूड' हा या वर्गातला सिनेमा आहे. तो न पाहणं म्हणजे नग्न सत्य नाकारणं...

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

‘सुहिता’

तुमच्यासाठी आयोगाचा मदतीचा हात

संकटात आहात?
माहिती हवीय?

Helpline

७४७७७२२४२४

घाबरू नका..
सहन करू नका...

संपर्क साधा ‘सुहिता’वर

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची हेल्पलाइन

आयोगाशी संपर्क

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

सख्खा भाऊ, पक्का वैरी...



सख्खा भाऊ म्हणून रवीला व्यवसायासाठी पैसे देण्याचा निर्णय रेखाने घेतला. मात्र, लोकांचे पैसे बुडवण्याची सवयच त्याला लागली होती. अखेर रेखाने महिला आयोगाकडे धाव घेतली.

धनंजय बिजले

रेखा (मूळ नाव बदलले आहे) आणि रवी (मूळ नाव बदलले आहे) हे दोघे बहीण-भाऊ. आई-वडिलांचे दोघांवरही सारखेच प्रेम. सुशिक्षित चौकोनी कुटुंबात जसे एकमेकांविषयी प्रेम असते, तसेच या चौघांत प्रेम होते. वडील एका खासगी कंपनीत नोकरीला. रेखा व रवी या दोघांना चांगले शिकवणे, लहानाचे मोठे करणे हे उभय दांपत्याचे पहिले ध्येय होते. शहरातील मध्यवर्गीयांकडे शेती किंवा जमीन काही नसते. नोकरी हेच त्यांचे खरे भांडवल व जगण्याचे महत्त्वाचे साधन असते. अशा कुटुंबात शिक्षणालाही कमालीचे महत्त्व असते. कारण, जर तुम्हाला शेती नसेल तर शिकण्याशिवाय काही पर्याय नसतो. दोघे आई-वडील आपल्या मुलांना नेहमी हे पदोपदी समजावून सांगत असत. दोघांमध्ये रेखा थोरली... तिच्या पाठीवर दोन वर्षांनी रवी झालेला. आई-वडिलांची दोघांवरदेखील सारखीच माया होती.

रेखाच्या वडिलांना तुलनेने चांगला पगार होता. शिवाय शहरात त्यांना घर विकत घेण्याचीही गरज भासली नाही. कारण, त्यांचं घर वडिलोपार्जित होते. शहरात सर्वांत मोठी गुंतवणूक करावी लागले ती घराच्या खरेदीसाठी. पण येथे तो प्रश्न नसल्याने रेखाच्या वडिलांना मिळणार्या पगारात त्यांचे घर चांगल्या प्रकारे चालत असे. चार पैसे शिल्लक ठेवण्यातदेखील त्यांना यश मिळत असे. दोघा बहीण-भावात रेखा हुशार होती. अभ्यासात तिचे नेहमी लक्ष असायचे. रवी मात्र थोडा उडाणटप्पूच होता. आई व वडील दोघेही स्वभावाने गरीब व प्रेमळ. त्यामुळे रवीचे जरा जास्तच फावले. शिवाय दोघेही तसे एकुलते एक. त्यात रवी धाकटा असल्याने त्याचे थोडे जास्तच लाड व्हायचे. रवीच्या आईचे शिक्षण फारसे झालेले नव्हते. त्यामुळे त्या मुलांचा फारसा अभ्यास घ्यायच्या नाहीत. केवळ 'मुलांनो, अभ्यास करा' इतके म्हणण्यापलीकडे त्या फारसे काही करायच्या नाहीत. कधी कधी त्या मुलांवर चिडायच्या. त्या वेळी रवी थोडाफार अभ्यास करायचा इतकेच. रेखा नेहमी चांगल्या मार्काने पास व्हायची, रवी मात्र कसाबसा पास व्हायचा.

''अरे रवी, जरा जास्त अभ्यास करत जा. रेखा काय लग्न होऊन सासरी जाईल. तुला तर नोकरी करून घर चालवावे लागणार आहे, म्हातारपणी आम्हाला सांभाळावे लागणार आहे. तेव्हा चांगली नोकरी लागायची असेल तर अभ्यासाशिवाय बाळा आपल्याला पर्याय नाही,'' वडील समजुतीच्या स्वरात नेहमी रवीला सांगायचे. रवी नुसता मान डोलवायचा. पण त्याचा ओढा बाहेर फिरण्याकडेच जास्त असायचा. हळू हळू दोघे बहीण-भाऊ दहावी पास झाले. बारावीत मात्र रवीचा एक विषय राहिला. घरच्यांचे डोळे त्यावेळी उघडले. पण आता बोलून काही उपयोग नव्हता. बारावीत त्याला संगतही फारशी चांगली लागलेली नव्हती. त्याचे मित्र चांगले नाहीत, असे रेखा त्याला नेहमी सांगायची. कारण दोघे एकाच महाविद्यालयात शिकत होते. त्यामुळे तिला रवी कोणासमवेत हिंडतो-फिरतो हे चांगले ठाऊक होते. रेखाला नेहमी भावाची काळजी लागलेली असायची. अभ्यास एकवेळ कमी कर, पण निदान चांगल्या मित्रांच्या सहवासात तरी राहत जा, असे ती त्याला नेहमी सांगायची. आता रवी मोठा झाल्याने तो तिचे ऐकायचे सोडाच, उलट तिच्यावरच डाफरायचा. तरीही रेखा भावाचे चांगले व्हावे म्हणून त्याला पदोपदी सांगण्याचा प्रयत्न करायची. रवीचे बहुतांश मित्र बारावीत नापासच झाले होते. पुढच्या प्रयत्नात रवी कसाबसा पास झाला व नंतर त्याने रडतखडत कला शाखेची पदवी मिळवली. रेखाने मात्र सायन्स शाखेला प्रवेश घेतला व ती पहिल्या श्रेणीत उत्तीर्णही झाली. पुढे तिने एमएस्सीचे शिक्षणदेखील घेतले.

वडिलांना रेखाची काळजी फार नव्हती, पण 'रवीचे काय होणार?', या प्रश्नाने ते नेहमी चिंताक्रांत असायचे. रेखाला बाबांची ही काळजी नेहमी दिसायची, सतवायची. रवी घराबाहेर गेला आणि रात्री उशिरापर्यंत आला नाही की घरात चिंतेचे वातावरण पसरायचे. त्या वेळी रेखाच त्याच्या मित्रांशी बोलून रवीला परस्पर निरोप देऊन घरी बोलावून घ्यायची. अशा प्रकारे रेखा शक्य तितकी घराची सारी काळजी वहायची. आता रेखाचे लग्नाचे वय झाले होते. वडिलांनी तिच्यासाठी अनुरूप वर

सोधण्यास सुरुवात केली. त्यांच्याकडे तशी फार काही श्रीमंती नव्हती. खाऊन पिऊन सुखी अशा प्रकारचे हे घर होते. शिवाय रेखाच्या वडिलांची नोकरीही आता संपत आली होती. निवृत्तीला अवघे दोन वर्षे राहिली होती. निवृत्तीच्या आत मुलीचे हात पिवळे करायचे, असा त्यांचा मानस होता. त्यात काही चुकीचेही नव्हते.

रेखा गेली दोन वर्षे एका महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापिका म्हणून नोकरीला लागली होती. तिला फार नाही पण बर्यापैकी पगार मिळत होता. आलेला पैसा ती इमानेइतबारे घरात वडिलांच्या हाती सोपवायची. वडील म्हणायचे, ''पोरी, पैसा तुझ्यासाठी ठेव. तुला काय हवे-नको त्यासाठी खर्च कर.'' पण रेखाने तसे कधीही केले नाही. रेखाच्या आई-वडिलांनीही मुलीचे पैसे घरात वापरायचे नाहीत... त्यातून तिच्या लग्नसाठी थोडे थोडे सोने विकत घ्यायचे, असेच ठरवले होते. त्यामुळे दर गुरुपुष्पामृताला ते सोने खरेदी करत. हळू हळू दोन वर्षांत त्यांनी रेखासाठी बर्यापैकी दागिने जमविले होते. रवी मात्र अजूनही म्हणावा तसा रांगेला लागलेला नव्हता. एक तर शिक्षणाच्या जोरावर पटकन नोकरी लागवी, असे त्याचे शिक्षण नव्हते आणि त्याचा स्वभावदेखील त्यात मोठा अडथळा होता. आपण कोणाच्या हाताखाली काम करणार नाही. स्वतःचा व्यवसायच सुरू करणार, असे तो मोठ्या तोर्यात घरच्यांना बजावत असे. पण व्यवसाय सुरू करण्यासाठी मोठे भांडवल लागते, असे वडील म्हणाले की तो त्यांच्यावर चिडत असे. तुमची स्वप्ने मोठी नव्हती, त्यामुळे आम्हीही छोटे राहिलो, असे तो बजावायचा. रेखा त्या वेळी त्याला रागवायची. त्या वेळी रवी आदळआपट करत तणतणत घराबाहेर जायचा.

आपलेच दात आणि आपलेच ओठ... अशी स्वतःची समजूत घालून आई-वडील निमूटपणे सारे सहन करायचे. कधी कधी त्यांना वाटायचे रेखापेक्षा रवीच जर शिकला असता तर किती बरे झाले असते. अनेकदा वडिलांना 'मुलाचे कसे होणार?' याचीही काळजी सतावायची. दिवस असेच चालले होते. एक दिवस रेखाला अनुरूप स्थळ आले. तिलाही मुलगा पसंत होता. मुलाचे नाव रमेश होते. तो चांगल्या बँकेत नोकरीस होता. घरची परिस्थिती उत्तम होती. आई-वडिलांचा तो एकुलता एकच होता. वडील निवृत्त झाले होते. त्यांचे स्वतःचे राहते घरही होते. मात्र ते राहत होते ते फारसे मोठे शहर नव्हते. तालुक्याचे गाव होते. पण रेखाला मुलगा पसंत होता. घरच्यांनाही स्थळ आवडले. रेखा मोठ्या शहरात वाढलेली. आई-वडिलांनी तिला सांगितले की, ''आम्ही म्हणतोय म्हणून तू होकार देऊ नको, तर पूर्ण विचार कर. लग्नानंतर तुला शहराऐवजी छोट्या गावात राहावे लागणार आहे. तेथे शहरासारख्या सार्या सोयी मिळतील अशातला भाग नाही. शिवाय तेथे तुला नोकरीही मिळेल याची शाश्वती नाही. कदाचित तुला गृहिणी म्हणून राहावे लागले. इतके शिकून काय फायदा झाला, असे तुला नंतर वाटेल. तेव्हा तू विचार कर. तू जे म्हणशील तसे आम्ही करू.''

रेखाने शांतपणे विचार केला. वडील जे म्हणत होते त्यात तथ्य नक्कीच होते. रमेश राहत असलेल्या गावात तिला प्राध्यापकपदाची नोकरी मिळणे कठीणच होणार होते. पण शहरापेक्षा गावच तिला आवडत असे. शहरात पैसा मिळत असला तरी रोजच्या दगदगीतून फारसे काही हाती लागत नाही, असे तिचे प्रांजळ मत होते. रोज ऊरफोड करून धावून पैसा हाती मिळतो, पण तितकाच तो खर्चही होता. शिवाय स्वतःसाठी, कुटुंबासाठी वेळ मिळत नाही. निवांतपणा तर शोधूनही सापडत नाही, असे तिचे मत होते. रमेशमध्ये काही वाईट नव्हते. तो हुशार होता. घरची सांपत्तिक स्थिती त्यांच्यापेक्षा चांगली होती. शिवाय सध्याच्या शहरापासून त्याचे गाव फार काही लांब नव्हते आणि ते गाव म्हणजे अगदीच काही खेडे नव्हते, तर ते तालुक्याचे ठिकाण होते. त्यामुळे तेथेही बर्यापैकी सुविधा होत्याच, तसेच शहरात सर्व काही चकचकीत असते. मॉल, फाईव्हस्टार हॉटेल सारे काही असते. पण ते कोणासाठी? ज्यांच्या हाती मुबलक पैसा आहे त्यांच्यासाठी. आपल्यासारख्या सामान्यांना तसाही त्याचा थेट काहीच उपयोग नसतो, असा तिचा व्यावहारिक व रास्त विचार होता. त्यामुळे तिने लग्नाला होकार दिला. रमेशलाही रेखा पसंत होती.

पुढे रेखाचे लग्न झाले. ती सुखाने नांदू लागली, आई-वडिलांचा ती मोठा मानसिक आधार होती. पण लग्नाची मुलगी विवाह करून तिच्या घरी असण्यात जो आनंद आई-वडिलांना मिळतो तो अन्य कशात मिळत नाही. रेखाच्या सासरचे लोकही चांगले, समजूतदार होते. त्यांचे घर प्रशस्त होते. त्यामुळे रेखाला फार छान वाटायचे. कधी कधी तिचे आई-वडील, भाऊ रवी त्यांच्याकडे अगदी आठ-आठ दिवस राहायला यायचे. रमेशचा स्वभावही चांगला होता. त्यामुळे या सार्यांचे तो आदरातिथ्य करायचा. दोन वर्षांनी रेखाला छान मुलगी झाली. दोन्ही घरात आनंदी वातावरण निर्माण झाले. एव्हाना रेखाचे वडील निवृत्त झाले होते. त्यामुळे अनेकदा ते नातीला भेटण्यासाठी येत असत.

रवीची गाडी मात्र काही केल्या रांगेला लागत नव्हती. त्याचे वयदेखील लग्न करण्याइतके झाले होते. त्याच्या अन्य मित्रांची एव्हाना लग्ने झाली होती. काहींना मुलेही झाली होती. तो फार काही कमवतदेखील नसल्याने पंचाइत झाली होती. इतके दिवस तो वडिलांच्या पैशांवर मजा करायचा. पण आता तेही निवृत्त झाले होते. दरवेळी तो कोणता तरी धंदा सुरू करायचा... पण त्यात पूर्ण क्षमतेने, अभ्यास करून तो उतरायचा नाही. त्यामुळे नेहमी त्याला नुकसान व्हायचे. अनेकांकडून त्याने पैसै उधार घेतले होते. पण त्यांचे कर्ज फेडण्याआधीच त्याला व्यवसायात अपयश यायचे. त्यामुळे त्याला आता कोणी उसने पैसे देण्यास तयारच व्हायचे नाही. मग पुन्हा त्याची चिडचिड व्हायची. समोर दिसेल त्याला तो बोलायचा. कधी कधी रेखाही त्याच्या या तडाख्यात सापडायची. तो

चिडला की त्याला समोर कोण आहे याचे भानच रहात नसायचे. आपलाच भाऊ आहे, असे समजून ती गप्प राहायची. दरम्यानच्या काळात रेखाच्या वडिलांचा मृत्यू झाला. त्यामुळे आता घरी रवी व आईच राहत होती. रवी आईलाही सतत बोलत असे. त्यामुळे तिलाही घरात राहायचे म्हणजे जिवावर यायचे. पण पोटचा मुलगा सोडून कोणतीच आई कोठे जात नाही. त्यामुळे ती गप्प राहून सारे काही ऐकून घ्यायची.

आता रवीने बहिणीकडेच पैसे मागायला सुरुवात केली होती. खरे तर आता रेखा नोकरी करत नव्हती. त्यामुळे तिच्याकडे स्वतःचे पैसे असण्याचा प्रश्न नव्हता आणि असते तरी तिला देणे शक्य झाले नसते. कारण, आता तिचा विवाह झाला होता. खरे तर रवीसाठी ती आता परक्या घरात गेली होती. पण रवीला त्याचे काही सोयरसुतक नव्हते. तो तिला रमेश भावजींकडून पैसे घेण्याची विनंती करायचा. रेखाची स्थिती बिकट व्हायची. पण कसाही असला तरी शेवटी तो तिचा लाडका भाऊच होता. त्यामुळे तिने एकदा पती रमेशकडे पैशांचा विषय काढला. रमेश तसा सरळ माणूस होता. तो म्हणाला, ''ठीक आहे, आज रवीला पैशांची गरज आहे. तर मग आपण नाही मदत करणार तर कोण करणार?'' त्यांनी बँकेतील ठेव मोडून रवीला दोन लाख रुपये दिले. सहा महिन्यांत पैसे देण्याचे त्याने कबूल केले. सहा महिने कधी उलटून गेले त्यालाही कळले नाही. तरीही रमेश रेखाला काहीही बोलला नाही.

या पैशांतून रवीने व्यवसाय सुरू केला होता. त्यात त्याचा जम बसतोय असे वाटत होते. नंतर वर्षाने त्याने बहिणीकडे आणखी दोन लाखांची मागणी केली. त्या वेळी मात्र रेखाने त्याला नकार दिला. पण रमेश पुन्हा मध्ये पडला. तो म्हणाला, ''असू दे, त्याचा व्यवसाय आता कुठे स्थिर होत आहे. त्यामुळे रवीला मदत केली तर तो लगेच स्थिरावेल.'' त्याने आणखी दोन लाख रुपये रवीला दिले. वर्ष-दोन वर्षे झाली तरी रवी चार लाख परत देण्याचे नावच काढेना. आता त्याचा व्यवसायही चांगला स्थिरावला होता. त्यातून त्याच्या हाती चांगले पैसे मिळत होते. तो चांगला नफाही मिळवत होता. पण ताईचे पैसे देण्याचे मात्र तो नावच काढत नव्हता. मिळालेले पैसे तो मित्रांवर उडवत असे. रोज हॉटेलमध्ये जेवायला जात असे. कधी कधी तो दारूही पीत असे.

रेखाची परिस्थिती आता बिकट होऊ लागली होती. आपला भाऊ नवर्याच्या पैशांवर मजा करतो आणि आपलेच पैसे परत देत नाही, हे पाहून ती अस्वस्थ होत असे. कारण, तिला सासरी नांदायचे होते. तिचे सासू-सासरे तिला आता यावरून टोमणे मारू लागले होते. रवीच्या आईचे त्याच्यापुढे काहीच चालत नसे. ती बोलायची... पण रवी तिला कसलीच दाद द्यायचा नाही. रेखा भावाला पैसे देण्यास का नकार देत होती, हे रमेशच्या आता ध्यानात येत होते. रवीला लोकांचे पैसे बुडवण्याची सवयच लागली होती. त्याने बाहेरच्यांना अशा प्रकारे अनेकदा टोप्या घातल्या होत्या. पण आता तो सख्ख्या बहिणीशीदेखील असेच वागू लागला होता. यावरून त्याच्या स्वभावाची सहज कल्पना येत होती. आता रमेशही अस्वस्थ झाला होता. त्याने थेट रवीला फोन लावला व पैशांची मागणी केली. नशीब त्यांना रवी काही उलटे बोलला नाही... पण 'पुढच्या आठवड्यात देतो' असे सांगून वेळ मारून नेली. असे पुढचे अनेक आठवडे आले, पण त्याने कधी पैसे देण्याचे नावच काढले नाही. आता रेखा त्याला सतत फोनवरून पैसे मागू लागली. पण तिलाही तो दाद देईनासा झाला. उलट फोनवरून तो तिला रागवू लागला, शिवीगाळ करू लागला. त्यामुळे तिची अवस्था आणखी बिकट झाली. सासर्याप्रमाणे तिला आता नवराही पैशांवरून बोलू लागला. तिच्या घरातील वातावरण रवीच्या अशा वागण्यामुळे बिघडून गेले होते. आता मात्र रेखा हट्टालाच पेटली व थेट माहेरी गेली. रवीला म्हणाली, ''काहीही करून पैसे परते दे. त्याशिवाय मी येथून हलणारच नाही.'' असे केल्यावर भाऊ पैसे देईल, अशी भाबडी आशा तिला होती. पण झाले उलटेच. रवीने तिला चक्क घराबाहेर जाण्यास सांगितले. त्यावर रेखाने नकार देताच त्याने चक्क तिला मारहाण केली. जवळजवळ त्याने तिला घराबाहेर हाकलूनच दिले. भावाचे हे वागणे पाहून रेखाला काय करावे, हेच सुचेना. आजूबाजूला फार बोभाटा होणार नाही, याची काळजी घेत ती अपमान गिळून सासरी परतली. भावा-बहिणीचे भांडण पाहून त्यांची आई धाय मोकलून रडू लागली; पण रवीच्या हृदयाला काही पाझर फुटला नाही. जणू सख्खा भाऊच तिचा पक्का वैरी झाला होता.

आता मात्र रेखाने मनाशी ठरवले की, झाले तेवढे पुरेसे झाले. आता भावाल काही करून अद्दल घडवलीच पाहिजे. ती शिकलेली होती. तिला जगाची माहिती होती. तिने रमेशच्या साथीने रवीच्या मानसिक छळाविरुद्ध व आर्थिक फसवणुकीविरुद्ध थेट राज्य महिला आयोगाकडे तक्रार केली. आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांच्या पाहण्यात अशा प्रकारची केस प्रथमच येत होती. एखाद्या वाह्यात भावामुळे बहिणीचा संसार अडचणीत येत होता. शिवाय पैसे असूनही रवी बहिणीचेच पैसे बुडवायला निघाला होता. ज्या बहिणीने गरजेवेळी पैसे दिले, तिला पैसे परत करायचे सोडून तो तिच्याच मुळावर उठला होता. तिलाच मारहाण करत होता. रवीने स्वतःचे आयुष्य तर बरबाद केलेच होते, आता तो बहिणीच्या सुखी आयुष्यावरही घाला घालत होता. त्यांनी तत्काळ रवीसह तिच्या भावाला नोटीस काढली. सुरवातीला रवीने नोटिसीला काहीच प्रतिसाद दिला नाही. जेव्हा पोलीस ठाण्यातून बोलावणे आले, त्या वेळी तो आयोगाच्या कार्यालयात गपगुमान हजर झाला. सुरवातीला त्याने आपण पैसे देण्यास कधीच नकार दिलेला नाही, असा दावा करत साळसूदपणाचा आव आणला. बहीण गप्प बसेल, असा त्याचा होरा होता. पण रेखाने त्याचे सारे बिंग फोडले, तसेच त्याने आतापर्यंत कितीदा शब्द फिरवला आहे, तसेच तो माझे पैसे न देता बाहेर कसे पैसे उडवतो, हे सांगितले. रेखाला आता त्याला धडा शिकवायचा होता. तो तिचा भाऊ असला तरीही त्याने तिचा, तिच्या नवर्याचा, त्यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेतला होता. पतीच्या कष्टाचे पैसे रवी तिच्यासमोर उडवत होता. हे पाहून तिने भाऊ असला तरी त्याला सरळ करण्याचे ठरविले होते. अखेर रवीला कायद्याच्या भाषेत सांगितल्यावर, तसेच त्याच्या संपत्तीत बहिणीचाही निम्मा वाटा आहे, हे निक्षून सांगितल्यावर तो जागेवर आला आणि मग तो चार हप्त्यांत पैसे परत करण्यास तयार झाला. तसे त्याने लेखी लिहून दिले. शिवाय कोणत्या तारखेला पैसे देणार, हे सांगून त्या तारखेचे चेकही दिले. अशा रीतीने आयोगाच्या मदतीने रेखाने धाकट्याा भावाला त्याच्या उद्दाम पणाची किंमत मोजायला लावली.

मुंबईतील वडाळा येथील डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या वतीने संयुक्तपणे लिंग समानता विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले या चर्चासत्रात प्रमुख पाहुणे होते. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य आशा लांडगे, डॉ. सिद्धार्थ कांबळे, चंद्रशेखर कमळे, बाबूभाई भवन, डॉ. यशोधरा वरळे आदी चर्चासत्रात सहभागी झाले.

मुंबईत महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि सोसायटी फॉर ह्युमन ॲबिलिटी डेव्हल्पमेंट एज्युकेशन यांच्या वतीने महिला सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दीपप्रज्वलन करताना आयोगाच्या सदस्य विंदा कीर्तीकर.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी ता. उमरगा, जि उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यामाने 'ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण : आव्हाने व उपाय' या दोन दिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

औरंगाबादच्या शासकीय न्यायवैद्यकीय संस्थेने आयोजित केलेल्या परिसंवादाचे उदघाटन महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. हा कार्यक्रम आयोगाने केलेल्या अर्थसहाय्यातून आणि सक्रिय सहभागातून झाला. न्यायवैद्यकीय संस्थेतील हा परिसंवाद वयात आलेल्या मुलांचे प्रश्न आणि कामांच्या ठिकाणी महिलांचे होणारे लैंगिक शोषण या दोन महत्वाच्या मुद्द्यावर होता. कामांच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषणाबाबत जनजागृतीची गरज असल्याचे रहाटकर यांनी अधोरेखित केले.

हिंजवडी प्रकरणाचा खटला द्रुतगती न्यायालयात चालवावा

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांची सूचना

पुणे : हिंजवडीजवळील कासारसाई येथील दोन अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार प्रकरणाचा खटला द्रुतगती न्यायालयात (फास्ट ट्रॅक कोर्ट) चालवावा, अशी सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी केली आहे. रहाटकर यांनी नुकतीच या घटनेतील पीडित मुलीची भेट घेतली.

राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री पंकजा मुंडे यांनीही या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. त्या व भाजपच्या महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा ॲड. माधवी नाईक व प्रदेश चिटणीस उमा खापरे यांच्या सुचनेनुसार पिंपरी-चिंचवड महिला मोर्चाच्या अध्यक्षा शैलजा मोळक आणि इतर पदाधिकारी सुरेखा बनकर, शोभा भराडे, बेटी बचाव, बेटी पढावचे समन्वयक अमित गुप्ता यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

या घटनेतील ऊसतोड कामगारांच्या या दोन बारा वर्षीय मुलींपैकी एकीचा मृत्यू झाल्याने तिच्यावर सामूहिक पाशवी अत्याचार झाले असावेत, असा संशय आहे.

मृत मुलीच्या मृत्यूमागील नेमके कारण कळण्यासाठी तिचा व्हिसेरा राखून ठेवला असल्याचे तपासाधिकारी शिवाजी गवारे म्हणाले. तसेच या प्रकरणामुळे भडका उडू नये म्हणून या गुन्ह्यात डमी आरोपी उभा केल्याची चर्चा व होत असलेला आरोपही या पोलिस अधिकाऱ्यांनी फेटाळला.

पिंपरीत घडलेल्या अल्पवयीन मुलींच्या कुटुंबीयाची भेट रहाटकर यांनी घेतली.

कायद्याची माहिती महिलांना होणे आवश्यक

पुण्यातील जनजागृती कार्यक्रमात विजया रहाटकर यांची अपेक्षा

साद प्रतिनिधी

महिलांकडे पाहण्याची विकृत मानसिकता ही समाजाला लागलेली कीड आहे. रुप, रंग, देहापलीकडे तो सन्मानाने कधी बघेल याची प्रत्येक स्त्री वाट बघत आहे. समाजातील सर्व पुरुष वाईट नाही. परंतु अशा विकृत मानसिकतेच्या लोकांमुळे समाजरचनेला धक्का पोहोचत आहे. याविरुद्ध लढा देण्यासाठी प्रत्येक महिलेला कायद्याची माहिती असणे आवश्यक आहे, असे मत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग व आम्ही पुणेकर यांच्या संयुक्त विद्यमाने महिला हक्क व कायदे या परिसंवादाचे आयोजन नवी पेठेतील पत्रकार भवन येथे करण्यात आले होते. यावेळी ॲड. सुप्रिया कोठारी, यशदाच्या उपसंचालक प्रेरणा देशभ्रतार, उद्योजिका नयना चोपडे, नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, पं. वसंतराव गाडगीळ, आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव, प्रणव पवार, अरविंद जडे, अखिल झांजले, दत्ता गायकवाड, समीर देसाई, मदन गोकुळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात विजया रहाटकर यांचा पुणेरी पगडी व सन्मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

विजया रहाटकर म्हणाल्या, आज अनेक क्षेत्रात महिला आपल्या मेहनतीने उच्च पदावर काम करताना दिसतात. पुरुषांच्या बरोबरीने त्या काम करत आहेत. सरकारने देखील अनेक योजनांद्वारे महिलांमध्ये सकारात्मक बदल घडविले आहेत. अशाप्रकारचे आशेचे चित्र दिसत असतानाच काही ठिकाणी मात्र महिलांवरील अन्याय, अत्याचाराचे प्रसंग घडत आहेत. अन्यायाविरुद्ध सध्या महिला आवाज उठवताना दिसत आहेत. त्या अत्याचार सहन न करता धीट होत आहेत.

ॲड. सुप्रिया कोठारी म्हणाल्या, महिलांना अन्याय, अत्याचाराविरुध्द लढा देण्यासाठी त्यांच्याविषयी असलेल्या कायद्यांची माहिती असली पाहिजे. त्यांना मुलभूत कायद्यांची माहिती असावी. आपल्यावर होणा-या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडून सक्षमपणे लढा द्या. प्रेरणा देशभ्रतार म्हणाल्या, महिलांभोवती असलेल्या असुरक्षिततेची चौकट आपल्या स्वत:लाच मोडावी लागणार आहे. महिलांनी मानसिकदृष्ट्या सक्षम असले पाहिजे. महिलांनी शिक्षण घेतले, त्या स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्या तर त्यांच्यात सुरक्षीततेची भावना निर्माण होईल, असेही त्यांनी सांगितले. नयना चोपडे म्हणाल्या, महिलांनी ठरविले तर त्या कोणतीही गोष्ट साध्य करू शकतात. आपल्या समोर कोणताही प्रसंग आला तरी त्याला खंबीरपणे सामोरे जा. हेमंत जाधव म्हणाले, महिलांना आपल्या हक्काविषयी तसेच कायद्याविषयी माहिती मिळावी यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते, असेही ते म्हणाले. नीरजा आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

‘निळ्या ज्योतीची कमाल’चे प्रकाशन

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर आणि मयुरा बिजले यांनी लिहिलेल्या निळ्या ज्योतीची कमाल (मॅजिक ऑफ ब्लू फ्लेम) या पुस्तकाचे प्रकाशन २५ सप्टेंबर रोजी ओडिशातील जगन्नाथपुरी येथे भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी केंद्रीय पेट्रोलियममंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीयमंत्री ज्युएल ओराम आदी उपस्थित होते. उज्ज्वला योजनेमुळे ज्यांच्या आयुष्यात फरक पडला अशा लाभार्थींच्या कहाण्या या पुस्तकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

निळ्या ज्योतीची कमाल (मॅजिक ऑफ ब्लू फ्लेम) या पुस्तकाचे प्रकाशन मुंबईत भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डावीकडून महसूलमंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय रेल्वेमंत्री पीयूष गोयल, विजया रहाटकर, मुख्यमंत्री, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे, केंद्रीयमंत्री हंसराज अहीर, विधानसभेचे अध्यक्ष हरीभाऊ बागडे आदी.

- गॅस शेगडीचे महत्त्व खऱ्या अर्थाने जाणून घ्यायचे असेल तर पंतप्रधान उज्ज्वला योजनेतून गॅस शेगडी मिळालेल्या भगिनींना आवर्जून भेटा. गॅसच्या निळाशार ज्योतीवर स्वयंपाक करताना त्यांचा चेहरा कसा आनंदाने फुलून जातो, चेहऱ्यावर समाधानाचे भाव कसे उमलतात हे पाहणे हा सुखद असा अनुभव ठरतो.
- उज्ज्वला योजनेसाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने दिलेल्या फेलोशिपमधून मराठवाड्यातील चार जिल्ह्यांचा अभ्यास करण्यात आला. अभ्यासातून पुढे आलेल्या माहितीच्या आधारे, निरीक्षणांच्या आधारे अहवाल सादर करण्यात आला. त्या अहवालावर आधारित बेतलेले हे पुस्तक आहे.
- पुस्तकात या योजनेचा सारा आढावा, पार्श्वभूमी, देशातील सध्यस्थिती याचा सविस्तर उहापोह करण्यात आलेला आहे.
- त्याचप्रमाणे अभ्यासादरम्यान भेटलेल्या विविध महिलांचे अनुभव, त्यांच्या सूचना यांचाही यात समावेश करण्यात आलेला आहे.
- देशात सुमारे २५ कोटी कुटुंबे आहेत. उज्ज्वला योजना सुरू होण्याआधी म्हणजे २०१६ पर्यंत त्यातील १३ कोटी घरांत गॅसची शेगडी होती. आज या योजनेच्या माध्यमातून अवघ्या अडीच वर्षांत ५ कोटींहून अधिक गरीब घरांत गॅसची शेगडी पोहोचली आहे.
- यामुळे गरीब महिलांच्या जीवनात कशाप्रकारे आमूलाग्र परिवर्तन घडत आहे याचा सविस्तर उहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे.
- उज्ज्वला योजनेवर सखोल अभ्यास करून लिहलेले हे पहिलेच पुस्तक आहे.

धुळे : राज्य महिला आयोग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातर्फे शनिवारी आयोजित कार्यशाळेत बोलताना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. सी. चांडक. व्यासपीठावर देवयानी ठाकरे, नालंदा निळे, सुधाकर देशमुख, ॲड. जितेंद्र निळे, ॲड. चंद्रकांत येशीराव.

धुळ्यातील विधी महाविद्यालयात महिला संरक्षणावर कार्यशाळा

धुळे : डिजिटल तंत्रज्ञानामुळे कोणतीही माहिती एका क्लिकवर सहज उपलब्ध होते. मात्र, अनेकदा डिजिटल तंत्रज्ञान वापरताना गैरवापर होण्याची शक्यता अधिक असते. फेसबुक, व्हॉट्सपसारख्या सोशल मीडियाचा वापर करताना महिलांनी स्वतः चे फोटो अपलोड करताना काळजी घ्यावी, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. सी. चांडक यांनी केले.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती विधी महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगातर्फे महाविद्यालयात आज महिलांचे संरक्षण या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. तीत उद्घाटनप्रसंगी न्या. चांडक बोलत होते. पश्चिम खानदेश दलित शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र निळे अध्यक्षस्थानी होते. महिला आयोगाच्या सदस्या देवयानी ठाकरे, महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख, संस्थेच्या संचालिका नालंदा निळे, महिला आयोगाचे जिल्हा समन्वयक ॲड. चंद्रकांत येशीराव, ॲड. जितेंद्र निळे, नंदुरबारचे प्राचार्य डॉ. एन. डी. चौधरी, जळगावचे प्राचार्य डॉ. युवकुमार रेड्डी, नाशिकचे प्राचार्य डॉ. एच. ए. कादरी, प्राचार्य विजय बहिरम व्यासपीठावर होते.

न्या. चांडक म्हणाले, की आधुनिक युगात तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. काळाच्या गरजेनुसार त्याचा वापर अवश्य करावा; पण आपल्या माहितीचा कोणी गैरवापर करू नये यासाठी सावध राहावे. आयुक्त देशमुख यांनी महिलांचे कायदे व त्याविषयी जनजागृतीची गरज या विषयावर मार्गदर्शन केले.

महिलांनी सक्षम व्हावे

महिलांच्या सुरक्षिततेसाठी राज्य महिला आयोग काम करीत आहे. महिलांनीही आपल्या हक्कांची, कायद्यांची माहिती घेऊन त्याचा योग्य वापर करावा. अन्याय, अत्याचार झाल्यास खचून न जाता कायद्याची मदत घ्यावी. सक्षम व आत्मनिर्भर बनावे, असे आवाहन महिला आयोगाच्या सदस्या देवयानी ठाकरे यांनी केले. ॲड. येशीराव यांनी 'पीसीपीएनडीटी' कायद्याविषयी माहिती दिली. ॲड. रसिका निकुंभ यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. त्यानंतर उपस्थित महिलांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले. समन्वयक प्रा. डॉ. संदेश शेगावकर, प्रा. डॉ. साजेदा शेख, डॉ. वैभव सबनीस, डॉ. आर. एन. मकासरे, प्रा. जयश्री साळुंखे, जी. एस. मेहकरकर, प्रा. के. एन. मुळे यांनी संयोजन केले.

सॅनिटरी नॅपकिन्सबाबत जनजागृती

स्वतःच्या स्वच्छतेबाबत महिलांमध्ये अजूनही फारशी जनजागृती झालेली दिसून येत नाही. सॅनिटरी नॅपकिन्सचा वापर करण्याची आवश्यकता आणि महिलांमधील गैरसमज या विषयावर कार्यशाळेत जनजागृती करण्यात आली. उपस्थित महिलांनीही चर्चेत सहभागी होत शंकांचे निरसन करवून घेतले.

सौजन्य : सकाळ

महिला आयोगातर्फे अमळनेरला कार्यशाळा

साद प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य महिला आयोग (मुंबई) आणि प्रताप महाविद्यालय यांच्या वतीने अमळनेर (जि. जळगाव) येथे नुकतीच भारतीय संस्कृतीतील बदलती महिला या विषयावर एक दिवसाची कायर्शाळा घेण्यात आली. आयोगाच्या सदस्य देवयानी ठाकरे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. आमदार स्मिता वाघ अध्यक्षस्थानी होत्या.

सप्तशृंगी बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष मीना भोसले उपस्थित होत्या. संस्थेचे अध्यक्ष नीरज अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त केले. देवयानी ठाकरे यांनी राज्य महिला आयोगाची उद्दिष्ट्ये आणि तळागळातील महिलांसाठीच्या योजनांविषयी मागर्दशर्न केले. मीना भोसले यांनी बचतगट संकल्पनेविषयी आणि आमदार वाघ यांनी राजकारणातील महिलांचा सक्रिय सहभाग याबद्दल मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात अड. ललिता पाटील यांनी महिलांच्या कायदेविषयक तर डॉ. स्वप्ना पाटील व डॉ. मयुरी जोशी यांनी आरोग्यविषयक समस्यांबाबत प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

कायर्शाळेला माजी प्राचार्य डॉ. एस. आर. चौधरी, प्रदीप अग्रवाल, योगेश मुंदडे, कमल कोचर, वसुंधरा लांडगे, माधुरी पाटील आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. ज्योती राणे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. नलिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. वृषाली वाकडे यांनी परिचय करून दिला. प्रा. हेमलता सूर्यवंशी यांनी आभार मानले.

आमदार राम कदम यांची महिला आयोगाकडे बिनशर्त माफी

भविष्यात महिलांचा सन्मान वाढविण्यासाठी कार्यरत राहण्याची हमी

साद प्रतिनिधी

वादग्रस्त वक्तव्यप्रकरणी आमदार राम कदम यांनी आपला खुलासा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे सादर केला आहे. त्यानुसार त्यांनी आयोगापुढे बिनशर्त माफी मागितली आहे. तसेच भविष्यात महिलांचा सन्मान वाढविण्यासाठी कार्यरत राहण्याची हमीही दिली आहे. आमदार कदम यांच्या या खुलाशावर कायदेशीर सल्ला घेऊन योग्य ती कार्यवाही करू, अशी माहिती महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनी दिली.

दहीहंडीच्या कार्यक्रमात बोलताना आमदार कदम यांनी वादग्रस्त वक्तव्ये केली होती. त्याची स्वतःहून (स्यू मोटो) दखल घेऊन आयोगाने त्यांना ५ सप्टेंबर रोजी आपले म्हणणे आठ दिवसांत सादर करण्याचे बजावले होते. त्यानुसार आमदार कदम यांनी आयोगाकडे लेखी खुलासा सादर केला असून, आयोगाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील महिलांची बिनशर्त माफी मागितली आहे.

मी यापूर्वीही महिलांची बिनशर्त माफी मागितली असून, महिला आयोगाच्या माध्यमातून माता-भगिनींची बिनशर्त माफी मागत असताना आयोगाला एवढेच आश्वस्त करू इच्छितो की आई-वडील हे साक्षात परमेश्वर आहेत आणि प्रत्येक स्त्री साक्षात लक्ष्मी आहे, हा संदेश रुजविण्यासाठी मी प्रयत्न करीत राहीन, असे आमदार कदम यांनी खुलाशात नमूद केले आहे.

महिलांविषयक वक्तव्य करताना आमदार कदम यांनी काळजी घ्यायला हवी होती, अशी टिप्पणी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केली होती. त्यानंतर त्यांना आयोगाने नोटीस बजावली होती.

सांगलीतील बेकायदा गर्भपात प्रकरणाची आयोगाने घेतली स्वाधिकारे दखल

साद प्रतिनिधी

सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चौगुले हॉस्पिटल येथे झालेल्या बेकायदा गर्भपात प्रकरणाची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने स्वाधिकारे (स्यू मोटो) दखल घेतली आहे. या प्रकरणाचा तसेच, कारवाईचा अहवाल सादर करण्याचा आदेश जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर या गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम २००३ची (पीसीपीएनडीटी) प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने स्थापन केलेल्या 'राज्य तपासणी व सनियंत्रण समिती'च्या अध्यक्षा आहेत.

या प्रकरणी सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांचा अहवाल आयोगास प्राप्त झाला आहे.

औरंगाबाद : 'लव्ह यू जिंदगी' या कार्यक्रमाला उपस्थित नागरिक.

'लव्ह यू जिंदगी'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

औरंगामधील कार्यक्रमात रहाटकर यांनी दिला नैराश्य झटकण्याचा मंत्र

औरंगाबाद : नैराश्याचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, त्याविषयी आजही समाजात मोकळेपणाने बोलले जात नाही. योग्य वेळी योग्य उपचार झाल्यावर नैराश्येतून बाहेर पडता येत असल्याचे मत पंख फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. मोनाली देशपांडे यांनी मांडले.

जागतिक मानसिक आरोग्य सप्ताहनिमित्त 'लव्ह यू जिंदगी' या राज्य महिला आयोग व पंख फाउंडेशन आयोजित कार्यक्रम आयएमए हॉल येथे रविवारी (ता. ७) पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त डॉ. वर्षा ठाकूर, डॉ. मोनाली देशपांडे, मानसोपचार संघटनेचे डॉ. विक्रांत पाटणकर, मधुरा अन्विकर, डॉ. सादिक कुरेशी, शुभांगी हिसवनकर, डॉ. आशिष मोहिदे उपस्थित होते. राज्य महिला आयोगाकडे महिन्याला येणाऱ्या तीन हजारांहून अधिक तक्रारींपैकी ३० टक्के तक्रारी नैराश्यग्रस्तांच्या असतात. जागतिक आकडेवारीनुसार ५.८ टक्के महिला, तर ३.६ टक्के पुरुष नैराश्याने ग्रासले आहेत. भविष्यात हा दुसऱ्या क्रमांकाचा घातक आजार असेल. त्यामुळे नैराश्यग्रस्तांना बोलते करणे, त्यांना मानसिक आधार देणे गरजेचे असल्याचे विजया रहाटकर म्हणाल्या. आय प्रोग्रेस फाउंडेशनच्या मुलांनी तयार केलेल्या वस्तूंनी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले, तर मैत्री ग्रुपतर्फे पथनाट्याचे सादरीकरण यावेळी झाले. अमोल देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

नैराश्यातून उभारी

नैराश्याविषयी कोणी बोलत नाही. मात्र, नैराश्यातून बाहेर पडून उभारी घेतलेल्या डॉ. नरेंद्र वैद्य, हर्षदा जोशी, सम्यका अंभोरे, विक्रांत दळवी व सतीश यांची डॉ. शीतल सावंत इटोलीकर यांनी मुलाखत घेतली. यात नैराश्याचा प्रवास व त्यानंतरचे उपचार आणि नैराश्यातून बाहेर पडल्यावर मिळविलेले यश यावर त्यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली.

सौजन्य : सकाळ

महिला, मुलांच्या सुरक्षिततेसाठी सरकारकडून ठोस पावले

औरंगाबादमधील कार्यक्रमात विजया रहाटकर यांचे प्रतिपादन

साद प्रतिनिधी

महिला आणि मुलांच्या सुरक्षिततेसाठी राज्य आणि केंद्र सरकारने ठोस पावले उचलली आहेत,अशी माहिती महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अधअयक्ष विजया रहाटकर यांनी येथे दिली.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग व पुष्कराज शिक्षण प्रसारक मंडळ यांच्यातर्फे औरंगाबाद येथे ७ ऑक्टोबरला लिंगभाव जाणीव जागृती व महिलाविषयक कायदे यांच्याबाबत कार्यशाळा झाली. आयोगाच्या अध्यक्षा मा. विजया रहाटकर यांनी त्याचे उदघाटन केले. यावेळी रहाटकर यांनी आयोगाच्या अनेक उपक्रमांची माहिती दिली. महिला आणि मुलांच्या सुरक्षिततेसाठी महिला आयोग कटिबद्ध आहे. आयोगाच्या प्रयत्नांचा भाग म्हणून राज्यातील ४५० महाविद्यालये, शाळा आणि सामाजिक संस्थांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. सन २०१२च्या ललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यात सुधरणा करून त्यात या गुन्ह्यांसाठी फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे लहान मुलींवरील अत्याचारांना पायबंद घालणे शक्य होईल, असा विश्वासही रहाटकर यांनी व्यक्त केला.

लैंगिक अत्याचारांविरोधातील लढ्याला नोबेल

नादिया मुराद, डॉ. डेनिस मुकवेगे यांचा सन्मान

साद प्रतिनिधी

युद्धातील लैंगिक हिंसाचाराविरोधात केलेल्या कामाबद्दल नादिया मुराद आणि कांगोचे डॉ. डेनिस मुकवेगे यांना २०१८ सालचा मानाचा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर झाला आहे. स्वत: बलात्काराची शिकार ठरलेल्या नादिया आणि स्त्रीरोग तज्ज्ञ असलेल्या मुकवेगे यांनी लैंगिक अत्याचाराविरोधातील लढाई लढतानाच जगभरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी उल्लेखनीय काम केल्यानेच त्यांचा गौरव करण्यात आल्याचं रॉय स्वीडिश अकादमीनं म्हटलं आहे.

यंदा नोबेल शांतता पुरस्कारासाठी ३३१ जणांची नावं आली होती. (त्यात २१६ लोकांची आणि ११५ संघटनांची नावे होती) त्यातून नादिया मुराद आणि डेनिस मुकवेगे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. तर २०१६ मध्ये निवड समितीकडे ३७६ लोकांची नावं आली होती. आतापर्यंत ९८ जणांना शांततेचा नोबेल पुरस्कार देण्यात आला आहे. त्यात १०४ लोकांचा आणि २७ संघटनांचा समावेश आहे. या १०४ विजेत्यांमध्ये १६ स्त्रियांचा समावेश आहे.

कॅन्सरवर काम करणारे जेम्स पी. एलिसन आणि तासुकू होंजो यांना चार दिवसांपूर्वीच संयुक्तपणे आरोग्य क्षेत्रातील नोबेल पुरस्कार देण्यात आले आहेत. कॅन्सरसारख्या दुर्धर आजारावर उपचार करण्यासाठी या दोघांनी एक नवीन थेरपी शोधून काढली आहे.

कोण आहेत डॉ. मुकवेगे

डेनिस मुकवेगे हे मूळचे कांगोचे. त्यांनी गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सातत्याने युद्धातील लैंगिक हिंसाचाराविरोधात आवाज उठवला आहे. मुकवेगे हे स्त्रीरोग तज्ज्ञ असून त्यांनी लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या ३० हजार स्त्रियांवर उपचार केले आहेत.

कोण आहेत नादिया

नादिया मुराद या इराकच्या असून त्या यजीदी या अल्पसंख्याक समाजातील आहेत. आयएस या दहशतवादी संघटनेने नादिया यांचं अपहरण केलं होतं. त्यांच्यावर या अतिरेक्यांनी अनेकवार बलात्कार करून त्यांचं शोषण केलं

“धर्मांतर न केल्यामुळे ३ महिन्यांपर्यंत रोज बलात्कार, शारीरिक छळ सोसावा लागला मी उत्तर इराकच्या शिंजामधील कोचू गावाची रहिवासी आहे. ३ ऑगस्ट २०१४ ला अतिरेक्यांनी हल्ला करून आम्हाला ओलीस धरले. ३ हजारांपेक्षा जास्त जणांची हत्या करून ५ हजार महिला व मुलांना बंधक बनवले. आम्ही दोन दिवसांत धर्मांतर करावे, अशी धमकी देण्यात आली. इस्लामचा स्वीकार करण्यास सांगण्यात आले. अतिरेक्यांनुसार, यजिदी समुदायाने आधी इस्लाम कबूल करून नंतर मेले पाहिजे. तीन महिने दररोज आमच्यावर सामूहिक बलात्कार होत राहिले. ६ भावांसह माझ्या संपूर्ण कुटुंबाची हत्या करण्यात आली. मी पळून जाण्यात यशस्वी ठरले. मदत छावणीत पोहोचले. आमची स्थिती काय आहे, हे मी जगाला सांगू इच्छित होते.

– नादिया मुराद



महिलांवर उपचार करण्यासाठी माझे आयुष्यही मी पणास लावेन

“आर्थिक तंगीमुळे काँगो युद्धात होरपळत आहे. यामुळे महिलांची प्रचंड वाताहत होत आहे. १९९९ मध्ये पहिली बलात्कारपीडिता माझ्या रुग्णालयात आली. बलात्कारानंतर तिच्या नाजूक अवयवांवर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. अशाच आणखी ४५ महिला आल्या. त्यांची कथाही अशीच होती. सर्वांनीच एकच सांगितले, आमच्या गावात लोक घुसले, बलात्कार केला आणि यातना दिल्या. अनेक वर्षांपर्यंत मी पीडित महिलांवर उपचार करत होतो. माझ्यावरही अनेक हल्ले झाले. २००९ देश सोडून स्वीडनला गेलो. मात्र लोकांच्या वेदनांना विसरू शकलो नाही. २०१३ मध्ये मी पुन्हा परतलो. आता या पीडितांची सेवा माझ्या आयुष्याचा भाग बनला आहे.

– डेनिस मुकवेगे

होतं. त्यांना आयएसची सेक्स स्लेव्हही म्हटलं जातं. या अतिरेक्यांच्या तावडीतून पळाल्यानंतर नादिया यांनी जगभरातील महिलांच्या लैंगिक अत्याचाराला वाचा फोडत जनजागृती करण्याचं काम केलं.

उत्क्रांतीच्या शक्तीचा वापर करून नवी प्रथिने निर्माण करणाऱ्या संशोधनाला या वर्षीचा रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या प्रथिनांचा वापर जैवइंधनापासून औषधे आणि इतर उपचारांमध्येही करता येणे शक्य आहे. फ्रान्सेस एच. अरनॉल्ड, जॉर्ज पी. स्मिथ आणि सर ग्रेगरी पी. विंटर या तिघांना या वर्षीचे रसायनशास्त्राचे नोबेल रॉयल स्वीडीश ऍकॅडमीने जाहीर केले. डार्विन यांचा उत्क्रांतीच्या सिद्धांताचा वापर प्रत्यक्ष परीक्षानळीत करून नवी प्रथिने तयार करण्याचे काम या तिघा शास्त्रज्ञांनी केले, असे नोबेल पुरस्कार समितीने म्हटले आहे.

या शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या पद्धतीमुळे नवी एन्झाईम आणि नवी प्रतिपिंड (अँटिबॉडी) तयार करणे शक्य झाले. त्यामुळे पर्यावरणस्नेही रसायन उद्योगाकडे वाटचाल करणे शक्य होईल; तसेच विविधा आजारांवर उपचार करून मानवी जीवन अधिक समृद्ध करता येऊ शकेल, असे पुरस्कार समितीने म्हटले आहे.

अरनॉल्ड या कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी एन्झाइम तयार करण्यासाठी थेटपणे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांचा वापर करून दाखविला. अरनॉल्ड या नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या अमेरिकेच्या केवळ पाचव्या महिला ठरल्या आहेत. यापूर्वी अदा योनाथ (२००९), डोरोथी क्रोफूट हॉजकिन (१९६४), आयरिन जोलिओट क्युरी (१९३५) आणि त्यांची आई मेरी क्युरी (१९११) यांना पुरस्कार मिळाला आहे.

स्मिथ हे मिसुरी विद्यापीठात प्राध्यापक आहेत. त्यांनी फेज डिस्प्ले ही पद्धत विकसित केली त्याद्वारे नवी प्रथिने निर्माण करणे शक्य झाले. सर विंटर हे ब्रिटनमधील केंब्रिज विद्यापीठात कार्यरत आहेत. त्यांनी नव्या अँटिबॉडी शोधून काढल्या. त्याचा उद्देश नवी औषधे तयार करण्यासाठी होता. या अँटिबॉडीजच्या साह्याने विषद्रव्यांचा प्रभाव नष्ट करता येऊ शकतो. पुरस्कार्थींना ९० लाख स्वीडीश क्रोनर देण्यात येणार आहेत. त्यापैकी निम्मी रक्कम अरनॉल्ड यांना, तर उर्वरित निम्मी रक्कम स्मिथ आणि विंटर यांना विभागून देण्यात येणार आहे.

व्यभिचार हा गुन्हा नाही

व्यभिचार हा गुन्हा नाही, असा महत्त्वाचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम ४९७नुसार व्यभिचार केल्यास पुरुष आणि महिला दोघांनाही समान शिक्षा मिळावी का, या प्रश्नावर निकाल देताना न्यायालयानं असं म्हटलं आहे. त्यानुसार विवाहित पुरुष एखाद्या विवाहित महिलेशी संबंध ठेवत असेल तर हा आता गुन्हा ठरणार नाही. याआधी विवाहबाह्य संबंधांमध्ये असणाऱ्या पुरुषाच्या पत्नीनं तक्रार केल्यास त्या पुरुषास पाच वर्षांपर्यंतचा तुरुंगवास होत होता. पण त्या संबंधांमध्ये असलेल्या महिलेस याआधी कुठल्याही शिक्षेची तरतूद नव्हती. व्यभिचार विषयक कायद्याअंतर्गत पुरुष आणि महिला दोघांनाही समान शिक्षा द्यायला हवी, अशी जनहित याचिका इटलीत राहणाऱ्या अनिवासी भारतीय जोसेफ शाइन यांनी डिसेंबर २०१७मध्ये दाखल केली होती.

या याचिकेच्या उत्तरात सरकारनं म्हटलं होतं की, असं करण्यासाठी व्यभिचार विषयक कायद्यात बदल करावे लागतील व यामुळे समाजावर वाईट परिणाम होईल. सुप्रीम कोर्टाच्या वकील करुणा नंदी सांगतात, या निकालाचा परिणाम इतर काही प्रकरणांवर होऊ शकतो, जसं की मॅरिटल रेप म्हणजे विवाहाअंतर्गत बलात्काराचं प्रकरण घ्यायचं झाल्यास यात मुळातच दोन्ही बाजूंची सहमती लागते. दोघांच्या सहमतीनं शरीरसंबंध घडत असतील तर गुन्हेगारी कृत्य समजू नये. व्यभिचाराच्या बाबतीतही संबंध सहमतीनं घडत असतील तर गुन्हा समजू नये.

काय आहे व्यभिचार कायदा?

व्यभिचार विषयक कायदा १५७ वर्षांपूर्वी १८६०मध्ये अस्तित्वात आला होता. या कायद्याअंतर्गत विवाहित पुरुष एखाद्या विवाहित महिलेशी तिच्या संमतीनं शारीरिक संबंध ठेवत असेल तर महिलेच्या पतीच्या तक्रारीनंतर पुरुषाला या कायद्याअंतर्गत गुन्हेगार मानलं जातं. गुन्हा सिद्ध झाल्यास पुरुषाला पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा आर्थिक दंड किंवा दोन्ही होऊ शकतात. पण एखादा विवाहित पुरुष अविवाहित तरुणी किंवा विधवा महिलेशी संबंध ठेवत असेल तर त्याला या कायद्याअंतर्गत दोषी मानता येणार नाही. यावर्षीच्या जानेवारी महिन्यात हा खटला सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या खंडपीठासमोर आलं होतं. १९५४, १९८५ आणि १९८८ मध्येही व्यभिचाराच्या कायद्यावर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. पण फक्त पुरुषांना दोषी ठरवणारा व्यभिचार विषयक कायदा जुनाट तर नाही ना झाला, असा प्रश्न गेल्या वर्षी सर्वोच्च न्यायालयानं उपस्थित केला होता. १९५४ व २०११ मध्ये या कायद्यावर सुनावणी करण्यात आली आहे. हा कायदा पुरुष-स्त्री समानतेचं उल्लघंन नाही, असा निर्णय त्यावेळी देण्यात आला होता.

कायद्याविषयी अडचण

दोन वयस्कर व्यक्ती सहमतीने शरीरसंबंध ठेवत असतील तर फक्त पुरुषांनाच शिक्षा का, अशी एक वादाची बाजू समोर आली होती. खासकरून पुरुषांनी या कायद्यावर नाराजी व्यक्त केली होती.

करुणा नंदी यांच्या मते ४९७ या कलमेमुळे महिलेकडे एक संपत्तीच्या स्वरूपात पाहिलं जातं, असं व्हायला नको. काही लोकांना वाटतं की पती पत्नीच्या विरोधातील प्रकरण समोर आणत नाही व महिलांना जास्त अधिकार आहेत. पण असं अजिबात नाही. कारण महिलेची इच्छा आहे की नाही यावर लक्ष दिलं गेलं नाही. हा १८६०चा कायदा आहे आणि यातून व्हिक्टोरियन मानसिकतेचं प्रदर्शन होतं. व्यभिचार चांगली गोष्ट असते असं कुणीच म्हणणार नाही पण याला गुन्ह्याच्या कक्षेत आणणं वेगळीच बाब आहे.

शबरीमला मंदिरातील महिलांची प्रवेशबंदी रद्द

नवी दिल्ली : केरळमधील प्रसिद्ध शबरीमला मंदिरात यापुढे सर्व वयोगटातील महिलांना प्रवेश देण्यासोबतच पूजा करण्याची परवानगीही सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच दिली. १० वर्षे ते ५० वर्षांपर्यंतच्या महिलांना या मंदिरात प्रवेश दिला जात नव्हता. मात्र, सुमारे ८०० वर्षांपासून सुरू असलेली ही प्रथा सुप्रीम कोर्टाच्या निकालामुळे बंद होत आहे. कोर्टाने केरळमध्ये १९६५ मधील हिंदू पूजास्थळ प्रवेश अधिकारासंबंधीचे कलम ३-ब रद्द ठरवले.

एका याचिकेद्वारे महिलांच्या या प्रवेशबंदीला आव्हान देण्यात आले होते. यावर पाच सदस्यीय घटनापीठाने हा निकाल दिला. दरम्यान, शबरीमाला मंदिराचे व्यवस्थापन पाहणारे त्रावणकोर देवस्वम मंडळ या निकालावर पुनर्विचार याचिका दाखल करण्याच्या तयारीत आहे.

सुप्रीम कोर्ट म्हणाले, महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत...

- सर्व अनुयायांना पूजा करण्याचा समान अधिकार आहे. लैंगिक आधारावर भेदभाव केला जाऊ शकत नाही : तत्कालीन सरन्यायाधीश दीपक मिश्रा.
- भगवान अयप्पांचे सर्व भक्त हिंदू आहेत. त्यामुळे मंदिर प्रवेशासाठी लादलेली बंधने अनिवार्य धार्मिक प्रथा मानली जाऊ शकत नाही.
- एकीकडे महिलांचे देवीसारखे पूजन करायचे आणि दुसरीकडे त्यांच्यावर अनावश्यक बंधने लादायची हे योग्य नाही.
- समाज पुरुषप्रधान असल्याचे मानून पितृसत्ताक पद्धतीचा पुरस्कार करत भक्तांमध्ये भेदभाव केला जाऊ शकत नाही.

का नाकारला जात होता प्रवेश?

केरळमधील शबरीमाला हे अय्यप्पा स्वामींचे (कार्तिकस्वामी) मंदिर आहे. शैव आणि वैष्णव पंथांतील वैमनस्यानंतर मधला मार्ग म्हणून स्थापन करण्यात आलेल्या या मंदिरात सर्व पंथांचे लोक दर्शनासाठी येतात. सुमारे ८०० वर्षांपूर्वीचे हे मंदिर असून अय्यप्पा स्वामी हे ब्रह्मचारी होते, अशी धार्मिक धारणा आहे. यामुळे मंदिरात तरुण महिलांना प्रवेशबंदी होती.

“ भक्तीमध्ये स्त्री-पुरुष भेदभाव असू शकत नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने अगदी योग्य म्हटले आहे. या ऐतिहासिक, पुरोगामी आणि लिंग समानतेचा पुरस्कार करणाऱ्या निकालाचे मी स्वागत करते. यापुढे कोणत्याही धर्माच्या प्रार्थनास्थळात कोणत्याही महिलेचे स्वागतच केले जाईल, अशी अपेक्षा.

– विजया रहाटकर

अध्यक्ष, राज्य महिला आयोग.

रीतिरिवाज ठरवणे कोर्टाचे काम नाही : न्या. मल्होत्रा

घटनापीठात तत्कालीन सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्या. ए. एम. खानविलकर, न्या. आर. एफ. नरिमन, न्या. डी. वाय. चंद्रचूड आणि न्या. इंदू मल्होत्रा यांचा समावेश होता. यात एकमेव महिला असलेल्या मल्होत्रांनी वेगळे मत मांडले. धर्मनिरपेक्ष वातावरण टिकवण्यासाठी धार्मिक मुद्द्यांशी छेडछाड होऊ नये. सतीसारख्या वाईट प्रथा सोडल्या तर इतर रीतिरिवाज कसे असावेत हे निश्चित करणे कोर्टाचे काम नाही. या निकालाचा परिणाम इतर मंदिरांवरही होईल. राज्यघटनेतील तरतुदी भारतीयांना श्रद्धेनुसार धर्माचे पालन करण्याचा अधिकार देतात, असे न्या. मल्होत्रा यांनी म्हटले.

इतर धार्मिक प्रमुखांचा पाठिंबा मिळवल्यानंतर आम्ही पुनर्विचार याचिका दाखल करू, असे त्रावणकोर देवस्वम बोर्डाचे अध्यक्ष ए. पद्मकुमार यांनी एका वृत्तसंस्थेला निकालाबाबत प्रतिक्रिया देताना म्हटले.

सौजन्य : दिव्य मराठी

अर्जुनासारखी एकाग्रचित्त

कोल्हापूरची अव्वल नेमबाज राही सरनोबतला नुकतेच अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक मिळणारी राही आधुनिक अर्जुनच म्हटली पाहिजे.

अमित मधुकर डोंगरे
amitdongre10@gmail.com

आपल्याकडे चित्ताची एकाग्रता कशी असावी, यासाठी अर्जुनाचे उदाहरण दिले जाते. चित्ताची एकाग्रता अर्जुनासारखी असावी, असे म्हटले जाते. आज काळ बदलला धनुष्यबाणाऐवजी आजकाल नेमबाजीसाठी पिस्तूलांचा वापर होतो. मात्र, योग्य नेम साधायचा तर चित्ताची एकाग्रता हवीच. कोल्हापूरची राही सरनोबत या बाबतीत आधुनिक अर्जुनच म्हटली पाहिजे.

नुकत्याच पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत २५ मीटर पिस्तूल प्रकारात राहीने सुवर्णपदक जिंकले. नेमबाजीत सुवर्णपदक मिळवणारी ती पहिली

भारतीय महिला ठरली. तिच्या या कामगिरीची दखल घेत तिला अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

२००६ मध्ये तेजस्विनी सावंत हिने नेमबाजीत राष्ट्रीय पदक मिळवले होते. त्यावेळी कोल्हापूरमध्ये तिची जंगी मिरवणूक काढण्यात आली होती त्यावेळी राही या मिरवणूकीत सर्वप्रथम तेजस्विनीला भेटली. या भेटीमुळे राही इतकी प्रभावीत झाली की आपणही तेजस्विनीप्रमाणेच नेमबाजी करावी आणि देशाचे प्रतिनिधीत्व करावे अशी स्वप्नही पाहू लागली त्यावेळी ती केवळ दहावीत होती. वडील जीवनराव आणि आई प्रभा यांना राहीने विज्ञान शाखेची पदवी घ्यावी असे वाटत होते मात्र पदवीपेक्षा आंतरराष्ट्रीय पदके मिळवणे हेच राहीचे ध्येय होते. २००८ पासून अजित पाटील यांच्याकडे संभाजी राजे क्रीडा संकुलात नेमबाजीचा सराव सुरू केला त्यानंतर आद्ययावत सरावासाठी ती पुण्यात लक्ष्य या संस्थेत दाखल झाली. त्याच वर्षी पुण्यात झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत तिने कारकीर्दीतील पहिलेवहिले पदक जिंकले. त्यानंतर तिने मागे वळून पाहिलेच नाही आजमितीला जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मिळून शेकडो पदके तिने मिळविली आहेत. २०१७ला दुखापतीमुळे तिला ऑलिंपिक पात्रता स्पर्धेत खेळता आले नाही परिणामी तिची ऑलिंपिक खेळण्याची संधी हुकली. आता एशियाडमधील मिळविलेल्या पदकामुळे २०२० च्या ऑलिंपिकसाठी ती पूर्ण सज्ज आहे.

राही सरनोबतने आशियाई क्रीडा स्पर्धेतील २५ मीटर एअर पिस्तूलच्या अंतिम फेरीत दोन शूटऑफनंतर सुवर्णपदक मिळवले. आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारी ती भारताची पहिलीच नेमबाज ठरली. या आशियाई स्पर्धेतील नेमबाजीतील भारताचे हे दुसरे सुवर्णपदक ठरले.

महिलांच्या २५ मीटर एअर पिस्तूलमध्ये राही सरनोबत आणि थायलंडची नफास्वान यांगपाईबून यांच्यात चांगलीच चुरस बघायाला मिळाली. शवास रोखून धरायला लावणारे दोन शूटऑफ हे या नेमबाजांची कसोटी पाहणारे ठरले. अखेर २७ वर्षीय महाराष्ट्रातील कोल्हापूरच्या राहीने स्पर्धा विक्रमासह सुवर्णपदक मिळवले.

३० ऑक्टोबर १९९० रोजी कोल्हापुरात राहीचा जन्म झाला. कोल्हापूरचा निष्णात नेमबाजांची परंपराच आहे. जयसिंग कुसाळे, तेजस्विनी सावंत याच परंपरेत राहीने नुसते स्थान मिळवले असे नाही, तर आपले स्थान अढळ करून ठेवले आहे.

राहीने २०१३ मध्ये कोरीयात झालेल्या विश्वकरंडक स्पर्धेत २५ मी. पिस्तूलमध्ये सुवर्णपदक मिळवले होते. त्यानंतर राष्ट्रकुल स्पर्धेमध्येही २०१० आणि २०१४ मध्ये सुवर्णपदकाची कमाई केली होती. २०१०च्या स्पर्धेत तिने दोन सुवर्णपदके मिळविली होती. एशियाडमधील तिच्या सुवर्ण कामगिरीवर आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. तो म्हणजे हे सुवर्णपदक तिने स्पर्धा विक्रमासह मिळवले आहे. तिच्या या कामगिरीबद्दल महाराष्ट्र सरकारने राहीला ५० लाख रूपयांचे बक्षिस जाहीर केले आहे. तसेच या स्पर्धेत

राष्ट्रपतींच्या हस्ते अर्जुन पुरस्कार स्वीकारताना राही सरनोबत.

सुवर्णपदक विजेत्या खेळाडूला ५० लाख, रौप्य विजेत्या खेळाडूला ३० लाख आणि ब्राँझ पदक विजेत्या खेळाडूला २० लाख रुपयांचे पारितोषिक सरकारने जाहीर केले आहे.

प्रत्येक खेळाडूच्या आयुष्यात कामगिरीची चढ-उतार होत असतेच. राहीच्याही कारकिर्दीत एक असा टप्पा येऊन गेला. हातालाच दुखापत झाल्यामुळे काही काळ तिला नेमबाजीपासून दूर राहावे लागले. त्या काळात तिची कामगिरी खालावली. मात्र, जिद्दी राहीने हार न मानता प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने मिळविलेले सुवर्णपदक हे तिच्या कष्टांचे फलित आहे.

केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या टीओपी (टार्गेट ऑलिंपीक पोडीयम) योजनेत राहीचा समावेश आहेच. त्यामुळे तिला मानधनाव्यतिरिक्त अत्याधुनिक सोयीसुविधा देखील मिळत आहेत. नेमबाजांसाठी ज्या बुलेट आवश्यक प्रमाणात उपलब्ध होणे गरजेचे आहे तितके मात्र होताना दिसत नाही, येत्या काळात यात सुधारणा झाली तर अनेक नेमबाजांना राहीसकट सर्वोत्तम सराव करता येईल. तिची आताची कामगिरी पाहता २०२०च्या टोकीओ ऑलिंपीकमध्ये राही भारताला निश्चीतच पदक मिळवून देईल असा विश्वास वाटतो.

पोलिसांकडून मदत कशी मिळवावी...

- महिलांनी त्यांच्याविरुद्ध होत असलेल्या गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी न घाबरता पोलीस ठाण्यास जावे.
- पोलीस ठाण्यात महिला अधिकारी तत्काळ दखल घेऊन तक्रार नोंदवून घेतील.
- तुमची तक्रार तुम्हाला वाचून दाखवली जाईल व फिर्यादीची एक प्रत त्वरित विनामूल्य दिली जाईल.
- विनयभंग, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांचे घटनास्थळ कोठे आहे याची काळजी करू नका. कोणत्याही पोलीस ठाण्यात जा. पोलीस तुमची तक्रार नोंदवून संबंधित पोलीस ठाण्यास त्वरित हस्तांतरित करतील.
- तुमचा जबाब नोंदवताना तुमच्यासोबत तुमची विश्वासार्ह व्यक्ती हजर राहू शकतील. तुम्ही कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी असाल तर पोलीस तुमची तक्रार नोंदवून घेतील. त्याचबरोबर तुम्हाला कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत जिल्हास्तरावरील महिला बाल विकास अधिकारी, या कार्यालयामार्फत सेवा उपलब्ध होऊ शकते याची माहिती देतील.
- महिला जर लैंगिक गुन्ह्याच्या बळी असेल तर महिलांच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्ती पोलीस ठाण्यास येऊन तक्रार देऊ शकते.
- महिला जर पोलीस ठाण्यास जाऊ इच्छित नसेल तर पोलिसांच्या मुंबई येथील १०३ व उर्वरित महाराष्ट्रकरिता १०९१ या हेल्पलाईनवर संपर्क साधा. म हिला पोलीस अधिकारी साध्या वेशात तुम्हाला सोयीस्कर ठिकाणी भेटून तुमची फिर्याद/जबाब नोंदवतील.
- महिला जर स्थानिक भाषेत बोलू शकत नसेल किंवा काही शारीरिक/मानसिक व्यंग असेल तर पोलीस दुभाष्या किंवा विशेष प्रशिक्षक बोलून त्यांच्या मदतीने तुमची फिर्याद/जबाब नोंदवून घेतील.
- महिला पोलीस ठाण्यात आल्यावर आरोपीच्या संपर्कात येणार नाही याची दक्षता पोलीस घेतील.
- पोलीस तुम्हाला गरजेनुसार वैद्यकीय उपचार/

तपासणीसाठी रुग्णालयात घेऊन जातील व महिला वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेतील.
- जर तुम्हाला आश्रय/निवारा हवा असेल तर तोही मिळवून देण्यास पोलिस सहकार्य करतील.
- महिला पोलीस अधिकारी पोलीस ठाण्यामध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलिस स्टेशनमध्ये महिलेस बोलविता येत नाही.
- महिला सायबर गुन्ह्याबाबत सायबर सेलशी संपर्क साधू शकतात.
- एखाद्या महिलेला अटक करताना महिला पोलीस व महिला साक्षीदार असतात.
- महिला त्यांच्याप्रकरणी जिल्हास्तरावर पोलिस अधीक्षक/आयुक्त कार्यालयातील महिला व मुलांकरिता सहायता कक्ष यांच्याकडे मदत मागू शकतात.
- विनयभंग, लैंगिक अत्याचार, सायबर गुन्हे अशा अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांची ओळख ही गोपनीय ठेवण्यात येईल.

महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

महिला आपल्या संरक्षणासाठी, अन्याय होत असताना मदत मागण्यासाठी या ठिकाणी फोन करू शकतात.

राज्य महिला आयोगाची 'सुहिता' हेल्पलाइन
७४७७७२२४२४

महिलांसाठी स्वतंत्र पोलिस हेल्पलाइन, पुणे
०२०-२६०५०१९१ (www.punepolice.gov.in)

पुणे नियंत्रण कक्ष
०२०-२६१२६२९६

पुणे महिला साह्य कक्ष
०२०-२६२०८३४१

पुणे सखी हेल्पलाइन
०२०-२४४८४५३५

आय लव्ह मुंबई आणि सकाळ
८८८८८०९३०६

पुणे गुन्हे शाखा कक्ष
०२०-२६११२२२२,
२६२०८२९५

हेल्पलाइन
१८१

स्त्री सन्मान हेल्पलाइन
०२२-८८८८८०९३०६

नवी दिल्ली हेल्पलाइन
१००/१८१

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com

प्रति / TO

If undelivered, pls return to,
महाराष्ट्र राज्य महिला आयोग,
मुंबई,
गृहनिर्माण भवन म्हाडा
बिल्डिंग, कलानगर,
वांद्रे (पू.),
मुंबई ४०००५१